दैनिक राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक २७५ ● मंगळवार, १५ जुलै २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## शिवसेना-मनसे युती तूर्तास 'वेट अँण्ड वॉच'

मराठी भाषा संदर्भात राज आणि उद्धव ठाकरे दोघांनी टिकून धरायचं की नाही ते त्यांनी ठरवायचं असून युतीबाबत माझं त्यांच्याशी बोलणं झालं नसल्याची प्रतिक्रिया मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली. तर, दोन्ही भावांनी एकत्र यावं. आता त्याची अजून पुढे चर्चा होईल. मात्र, महाराष्ट्राच्या हिताचा आहे ते आम्ही करु अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरे यांनी म्हटल आहे. प्रवक्त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देऊ नये अशा सूचना राज ठाकरे यांनी केल्या आहेत असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी मनसेच्या भूमिकेवर प्रतिक्रिया दिली आहे. महापालिका निवडणुका जाहीर झाल्यावर शिवसेना-मनसेच्या युतीचं पाहू. उद्धव ठाकरे यांनीही वेट अँण्ड वॉचची भूमिका घेतली आहे.



### झापुक । zupuk

धनप्राप्ती प्रत्येकाचं
ध्येय झालंय
अमृता ऐवजी हाती
विषाच पेय आलंय
पैसाच जगण्याचं
होऊ लागलं साधन
नीती मुल्यांसाह संस्कृतीचं
होऊ लागलं अधः पतन
आईसमान सासुलाही
पाण्यात पाहू लागली सून
धनासाठी सख्खा भाऊ
करू लागला भावाचा खून

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

### महत्वाचे...

#### समृद्धी महामार्गावरुन १२१ किलो गांजाची तस्करी

**नाशिक :** महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा म्हणत नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाचे मोठ्या धडाक्यात लोकार्पण करण्यात आले. आता, संपूर्ण महामार्ग प्रवाशांसाठी खुला करण्यात आला आहे. मात्र, हा महामार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून अपघाताच्या घटनांनी चर्चेत आहे. सातत्याने या महामार्गावर होणारे अपघात चिंतेची आणि संसोधनाची बाब बनला आहे. त्यातच, आता समृद्धी महामार्गाने नागपूरकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या दोन चार चाकी वाहनांमध्ये गांजाचा मोठा साठा आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. नाशिक पोलिसांनी ही दोन वाहने जप्त केली असून त्यातून तब्बल १२१ किलो गांजा जप्त केला आहे. या कारवाईत तीन गांजा तस्कर पोलिसांच्या ताब्यात असून त्यातील एक फरार झाला आहे. नाशिक ग्रामीण पोलिसांचे पथक अद्यापही त्याच्या मागावर असून तिघांना सिताफीने अटक करण्यात आली आहे. या कारवाईत तब्बल ३६ लाख २९ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

#### शिवसेना पक्ष - चिन्हाची सुनावणी आता ऑगस्टमध्ये!

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि चिन्हावरुन ठाकरे गट आणि शिंदे गटात सुरु असलेला वाद आता निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. सर्वोच्च न्यायालयात या खटल्याच्या सोमवारी झालेल्या सुनावणीवेळी खंडपीठाने महत्त्वाच्या सूचना दिल्या. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी आजच्या सुनावणीत एक महत्त्वाची टिप्पणी केली. त्यांनी ठाकरे गटाला सांगितले की, आता या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत. तुम्ही त्यामुळे आता नव्याने अर्ज करणे बंद करा. हे प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. आता याप्रकरणाची मुख्य सुनावणी ऑगस्ट महिन्यात घेऊ, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली.यावेळी शिंदे गटाकडून मुकूल रोहतगी आणि नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. तर ठाकरे गटाकडून रोहित शर्मा आणि कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला.

# पालिकांचे प्रभाग अन् आरक्षण जाहीर

## अहिल्यानगर जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा व नेवासा नगरपंचायतीचा समावेश



**अहिल्यानगर : जिल्ह्यातील ११ नगरपरिषद आणि एका नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी लोकसंख्येच्या आधारावर सदस्य संख्या आणि आरक्षण निश्चित केले आहे. या निवडणुका श्रीरामपूर, कोपरगाव, संगमनेर, जामखेड, राहाता, शेवगाव, राहुरी, श्रीगोंदा, पाथर्डी, देवळाली प्रवरा, शिर्डी या ११ नगर परिषद आणि नेवासा नगरपंचायतीसाठी प्रस्तावित आहेत. या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम सुरू असून, प्रारूप प्रभाग रचना २२ ते २८ ऑगस्ट २०२५ दरम्यान हरकतींसह प्रसिद्ध होणार आहे, तर अंतिम प्रभाग रचना ३ ते ६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान जाहीर केली जाईल. या प्रक्रियेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मार्ग मोकळा होणार आहे.** (पान ४ वर)

### नगरपरिषद निहाय सदस्य संख्या आणि आरक्षणाचा तपशील

**श्रीरामपूर नगरपरिषद :** एकूण ३४ सदस्य, यापैकी १७ जागा महिला राखीव, ६ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, ९ नामाप्र (नागरिकांचा मागासवर्ग), आणि ८ सर्वसाधारण आहेत.
**कोपरगाव नगरपरिषद :** एकूण ३० सदस्य, यापैकी १५ जागा महिला राखीव, ५ अनुसूचित जाती, २ अनुसूचित जमाती, ८ नामाप्र, आणि ८ सर्वसाधारण आहेत.
**संगमनेर नगरपरिषद :** एकूण ३० सदस्य, यापैकी १५ जागा महिला राखीव, २ अनुसूचित जाती, ० अनुसूचित जमाती, ८ नामाप्र, आणि ८ सर्वसाधारण आहेत.
**जामखेड नगरपरिषद :** एकूण २४ सदस्य, यापैकी १२ जागा महिला राखीव, ३ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, ६ नामाप्र, आणि ७ सर्वसाधारण आहेत.
**राहाता नगरपरिषद :** एकूण २० सदस्य, यापैकी १० जागा महिला राखीव, ३ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, ५ नामाप्र, आणि ४ सर्वसाधारण आहेत.
**शेवगाव नगरपरिषद :** एकूण २४ सदस्य, यापैकी १२ जागा महिला राखीव, ४ अनुसूचित जाती, ० अनुसूचित जमाती, ६ नामाप्र, आणि ७ सर्वसाधारण आहेत.
**राहुरी नगरपरिषद :** एकूण २४ सदस्य, यापैकी १२ जागा महिला राखीव, ४ अनुसूचित जाती, २ अनुसूचित जमाती, ६ नामाप्र, आणि ६ सर्वसाधारण आहेत.
**श्रीगोंदा नगरपरिषद :** एकूण २२ सदस्य, यापैकी ११ जागा महिला राखीव, ३ अनुसूचित जाती, ० अनुसूचित जमाती, ६ नामाप
**पाथर्डी नगरपरिषद :** एकूण २० सदस्य, यापैकी १० जागा महिला राखीव, २ अनुसूचित जाती, ० अनुसूचित जमाती, ५ नामाप्र, आणि ६ सर्वसाधारण आहेत.
**देवळाली प्रवरा नगरपरिषद :** एकूण २१ सदस्य, यापैकी ११ जागा महिला राखीव, ३ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, ६ नामाप्र, आणि ५ सर्वसाधारण आहेत.
**शिर्डी नगरपरिषद :** एकूण २३ सदस्य, यापैकी १२ जागा महिला राखीव, ५ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, ६ नामाप्र, आणि ६ सर्वसाधारण आहेत.
**नेवासा नगरपंचायत :** एकूण १७ सदस्य, यापैकी ९ जागा महिला राखीव, २ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, ५ नामाप्र, आणि ५ सर्वसाधारण आहेत.

### मंत्री संजय शिरसाटांचा पाय आणखी खोलात...

## सामाजिक न्याय विभागाच्या १५०० कोटींच्या टेंडरचा घोटाळा?



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** हॉटेल खरेदी, आयकर विभागाची नोटीस, पैशाची बॅग अशा विविध वादात अडकलेल्या सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांचा पाया आणखी खोलात जाताना दिसत आहे. सामाजिक न्याय विभागाच्या टेंडर प्रक्रियेत १५०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची चर्चा आहे.

गेल्या काही दिवसांपासून चौकशीच्या भोवऱ्यात सापडलेले संजय शिरसाट मंत्री असलेल्या सामाजिक न्याय विभागाने काढलेल्या १५०० कोटींच्या टेंडरमध्ये मोठा घोटाळा उघड झाला आहे. याबद्दल सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार सोशल मिडीयात माहिती दिली. तसेच त्यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे चौकशीची मागणी केली आहे.

या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आधीच अनेक गंभीर आरोप आहेत. आता सामाजिक न्याय विभागाने काढलेल्या १५०० कोटींच्या टेंडर क्र. ३७४ मध्ये मोठा घोटाळा उघड झाला आहे. यामध्ये स्मार्ट सर्व्हिसेस (पूर्वीची ब्रिस्क इंडिया), बीव्हीजी इंडिया आणि क्रीस्टल इंटीग्रेटेड सर्व्हिसेस - फक्त ह्याच तीन कंपन्या पात्र ठरवण्यात आल्या आहेत. तसेच या तिनही कंपन्यांना १९.५०% हाच सर्व्हिस चार्ज दिल आहे. हे बेकायदेशीर असून पूर्वी ब्रिस्क इंडियाला ब्लॅकलिस्ट करा, असे पत्र आपणच दिले होते.

त्याचबरोबर या टेंडरमध्ये एकूण खर्चाचा उल्लेख नाही. ३६३४ कामगार, ६ वर्षांचा कालावधी पण कोणत्या पदासाठी किती वेतन हेच दिलेले नाही. केवळ सर्व्हिस चार्जच्या आधारावर हजारो कोटींचा निर्णय घेण्यात आला आहे. १३ वर्षे हेच ठेकेदार - एकाच पॅटर्नवर आहेत. तर २०१३ पासून आजपर्यंत हेच तीन खेळाडू. १० वर्षे कोणतेही नविन टेंडर न काढता काम सुरू आहे. एकाच टेंडरवर १५०० कोटींचे पेमेंट काढण्यात आले आहेत. त्यामुळे सदर टेंडर तात्काळ रद्द करावे. रिंग करणाऱ्या कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करावे. जिल्हानिहाय टेंडर प्रणाली लागू करावी - स्थानिक महिला गट, युवक, संस्थांना संधी मिळेल. मागील १३ वर्षांचा गैरव्यवहार(पान ४ वर)

# साखर कामगारांना मिळणार १० टक्के वेतनवाढ!

## शरद पवारांचा प्रस्ताव कामगार संघटना कारखानदार आणि शासनालाही मान्य



**पुणे :** राज्यातील साखर कारखाना कामगारांच्या वेतनवाढीबाबत त्रिपक्षीय समितीच्या माध्यमातून मार्ग करताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मांडलेला १० टक्के पगार वाढीचा निर्णय साखर कामगार संघटनांचे प्रतिनिधी, साखर कारखान्यांचे मालक प्रतिनिधी आणि शासन प्रतिनिधी यांनी मान्य केला.

त्यामुळे राज्यातील सर्व साखर कारखाना कामगारांना १० टक्के पगारवाढ देण्यात येणार आहे. हा करार २०२४ ते २०२९ या कालावधीसाठी असणार आहे.

साखर कारखाना कामगारांबाबत वेतनवाढीचा पाच वर्षाच्या कराराचा कालावधी ३१ मार्च २०२४ रोजी संपला होता. नविन करारासाठी शासनामार्फत त्रिपक्ष समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या एकूण चार बैठका झाल्या.

कामगार संघटनांनी १८ टक्के वेतनवाढीची मागणी केली होती. तर साखर कारखान्यांनी वेतनवाढ रास्त असावी, अशी आग्रही भूमिका घेतली होती. गेल्या ४० वर्षांपासून साखर कारखाना कामगार आणि साखर कारखाने व्यवस्थापन प्रतिनिधी खासदार शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयाच्या तोडग्यानुसार निर्णयाप्रत येण्याची परंपरा पाळीत आहेत.

साखर कारखाना कामगार प्रतिनिधी आणि साखर कारखाना मालक प्रतिनिधी, शासन प्रतिनिधी यांची बैठक आज १४ जुलै रोजी झाली. या बैठकीत तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. यावेळी शरद पवार यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. साखर उद्योगाची परिस्थिती, कारखान्यांची स्थिती, कामगारांची आवश्यकता या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन शरद पवार यांनी १० टक्के वेतनवाढीचा प्रस्ताव ठेवला. त्याला दोन्ही पक्षांनी मान्यता दिली. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या वतीने ही घोषणा करण्यात आली.



# साईंच्या झोळीत साडेसहा कोटींचे दान

शिर्डी : गुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत दक्षिणापेटी, देणगी काऊंटर, ऑनलाईन, चेक डीडी, मनिऑर्डर, डेबीट-क्रेडीट कार्ड, युपीआय, सोने, चांदी व दर्शन/आरतीपास शुल्क इ. सर्व मार्गांनी मिळून एकूण ६ कोटी रुपयांपेक्षा जादा देणगी प्राप्त झाली असून, या उत्सवात सदर देणगीमध्ये रोख स्वरुपात रुपये १ कोटी ८८ लाख ८ हजार १९४ रुपये दक्षिणा पेटीत प्राप्त झाली असून, देणगी काऊंटर १ कोटी १७ लाख ८४ हजार ५३८ रुपये, पी.आर.ओ. सशुल्क पास ५५ लाख ८८ हजार २००, डेबीट क्रेडीट कार्ड, ऑनलाईन देणगी, चेक डी.डी.देणगी, मनी ऑर्डर असे एकूण २ कोटी ५ लाख ७६ हजार ६२६ रुपये, सोने ६६८.४०० ग्रॅम रक्कम रुपये ५७ लाख ८७ हजार ९२५ व चांदी ६,७९८.६८० ग्रॅम रक्कम रुपये ५ लाख, ८५ हजार ८७९ यांचा समावेश आहे.श्रीगुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत साधारणतः ३ लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला. उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे १ लाख ८३ हजार ५३२ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला तर दर्शन रांगेत १ लाख ७७ हजार ८०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले. या कालावधीत सशुल्क प्रसादरुपी लाडू पाकीटांच्या विक्रीतून ६४ लाख ५ हजार ४६० रूपये प्राप्त झाले. उत्सव काळात हजारो साईभक्तांनी संस्थानच्या साईप्रसाद निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम निवास व साईधर्मशाळा आदी ठिकाणांबरोबर अतिरिक्त निवास व्यवस्थेकरिता उभारण्यात आलेल्या मंडपात निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. तसेच साईधर्मशाळा येथे विविध भागातून आलेल्या पालख्यांमधील पदयात्री साईभक्तांनी निवास व्यवस्थेचा लाभ घेतला. देणगीचा वापर श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, रुग्णालये, शैक्षणिक संकुल या सेवाकार्याबरोबरच साईभक्तांच्या विविध सेवासुविधांसाठी होत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सांगितले.

### लाखो भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ

## निवडणुकांचे पडघम...

# जिल्हा परिषदेचे ७५ गट; पंचायत समितीचे १५० गण जाहीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण रचनांचा प्रारूप आराखडा आज जिल्हाधिकारी कार्यालयाने जाहीर केला. लोकसंख्येच्या प्रमाणात गट निश्चित करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे ७५, तर पंचायत समितीचे १५० गण राहणार आहेत. यापूर्वी ७३ गट व १४६ गण होते. कर्जत व जामखेड तालुक्यात प्रत्येकी एक गट, तर पंचायत समितीचे दोन गण वाढले आहे.यापूर्वी २०१२ मध्ये जिल्हा परिषदेचे ७५ गट व १५० गण होते. आता त्यानुसार यंदाची निवडणूक होणार आहे. त्यामुळे या प्रारूप आराखड्याकडे इच्छुकांचे लक्ष लागलं होतं. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी अधिसूचना जारी केली आहे.** (पान ४ वर)

### जिल्हा परिषदेसाठी तालुकानिहाय गट व गण

**अकोले-**
गट : समशेरपुर, देवठाण, धामणगाव आवारी,राजुर, सातेवाडी, कोतुळ.
गण - समशेरपुर, खिरवीरे, देवठाण, गणोरे, धुमाळवाडी, धामणगाव आवारी, राजूर,वारघुंशी,मवेशी,सातेवाडी,कोतुळ, ब्राम्हणवाडा.

**संगमनेर -**
गट : समनापूर, तळेगाव, आश्वी बुद्रुक, जोर्वे, घुलेवाडी, धांदरफळ बुद्रुक,चंदनापुरी, बोटा, साकूर.
गण: निमोण, समनापूर, तळेगाव, वडगांव पान, आश्वी बुद्रुक, आश्वी खुर्द, जोर्वे, अंभोरे, घुलेवाडी, गुंजाळवाडी, राजापूर, धांदरफळ बुद्रुक, संगमनेर खुर्द, चंदनापुरी, खंदरमाळवाडी, बोटा, पिंपळगांव देपा, साकूर.

**कोपरगाव-**
गट : सुरेगांव, ब्राम्हणगाव, संवत्सर, शिंगणापूर, पोहेगांव बुद्रुक.
गण : सुरेगाव, धामोरी, ब्राम्हणगाव, करंजी बुद्रुक, वारी, संवत्सर, शिंगणापूर, कोळपेवाडी, चांदेकसारे, पोहेगाव बुद्रुक.

**राहाता-**
गट : पुणतांबा, वाकडी,साकुरी, लोणी खुर्द, कोल्हार बुद्रुक.
गण: सावळीवहीर बुद्रुक, पुणतांबा, वाकडी, लोहगाव, अस्तगाव, साकुरी, लोणी बुद्रुक, लोणी खुर्द, दाढ बुद्रुक, कोल्हार बुद्रुक

**श्रीरामपूर-**
गट : उंदिरगाव, टाकळीभान, दत्तनगर, बेलापूर बुद्रुक.
गण: निमगांव खैरी, उंदीरगांव, टाकळीभान, निपाणीवडगांव, दत्तनगर, उक्कलगांव, बेलापूर ब्रुदुक, पढेगांव.

**नेवासा-**
गट: बेलपिंपळगाव, कुकाणा, भेंडा बुद्रुक, भानसहिवरे,खरवंडी,सोनई,चांदा.
गण : बेलपिंपळगाव, सलाबतपूर, शिरसगाव, भेंडा ब्रुदुक, मुकिंदपुर, भानसहिवरे,पाचेगाव,करजगाव, खरवंडी, सोनई, घोडेगाव, चांदा, देडगाव.

**शेवगाव-**
गट : दहिगाव ने, बोधेगाव, भातकुडगाव, लाडजळगाव.
गण: दहिगाव ने, घोटण, मुंगी, बोधेगाव, भातकुडगाव, अमरापुर, खरडगाव, लाडजळगाव.

**पाथर्डी-**
गट : कासार पिंपळगाव, भालगाव, तिसगांव, मिरी, टाळीमानूर.
गण : कासार पिंपळगांव, कोरडगाव, भालगाव, अकोला, माळीबाभुळ गाव, तिसंगाव, मिरी, करंजी, माणिकदौंडी, टाकळीमानूर.

**नगर तालुका -**
गट: नवनागापूर, जेऊर, नागरदेवळे, दरेवाडी, निंबळक, वाळकी.
गण : देहरे, नवनागापुर, जेऊर, बुऱ्हाणनगर, नागरदेवळे, केकती, दरेवाडी, चिचोंडी पाटील, निंबळक,चास, वाळकी, गुंडेगाव.

**राहुरी-**
गट: टाकळीमियाँ, ब्राम्हणी, गुहा, बारागांव नांदूर, वांबोरी.
गण : कोल्हार खुर्द, टाकळीमियाँ, मानोरी, ब्राम्हणी, गुहा, सात्रळ, बारागांव नांदूर, डिग्रस, उंबरे, वांबोरी.

**पारनेर-**
गट: टाकळीढोकेश्वर, ढवळपुरी, जवळा, निघोज, सुपा.
गण : कर्जुले हर्या, टाकळीढोकेश्वर,ढवळपुरी, भाळवणी, कान्हुर पठार, जवळा, अळकुटी, निघोज, वाडेगव्हाण, सुपा.

**श्रीगोंदा-**
गट : येळपणे, कोळगाव, मांडवगण, आढळगाव, बेलवंडी, काष्टी.
गण : देवदैठण, येळपणे, कोळगाव, पारगाव सुद्रिक, मांडवगण, भानगाव, आढळगाव, पेडगाव, बेलवंडी, हंगेवाडी, काष्टी, लिंपणगाव.

**कर्जत-**
गट : मिरजगाव, चापडगाव, कुळधरण, कोरेगांव, राशिन.
गण : मिरजगांव, कोभळी, टाकळी खंडेश्वरी, चापडगाव, दुरगांव, कुळधरण, कोरेगांव, चिलवडी, राशिन, भांबोरा.

**जामखेड -**
गट : साकत, खर्डा, जवळा,
गण : शिऊर, साकत, खर्डा, नान्नज, अरणगाव,जवळा.

## संपादकीय

# नवीन अध्यक्ष अन् भाजपची नवी दिशा..!

गेल्या काही महिन्यांपासून भारतीय जनता पक्षांकडून नवीन राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीच्या हालचाली सुरू आहेत. आतापर्यंच अध्यक्षपदासाठी अनेकांच्या नावे समोर आली आहेत.पण अद्याप कोणत्याही नावावर शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यामुळे भाजप संघटनेत उत्सुकताही शिगेला पोहचली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, भाजपचे विद्यमान अध्यक्ष जे.पी. नड्डा यांचा कार्यकाळ जून २०२४ मध्येच संपला आहे. पण त्यानंतरही त्यांना काही महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील पाच देशांच्या दौऱ्यावर अससल्यामुळे राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीला विलंब होत असल्याची चर्चा होती. पण आता तेदेखील दौऱ्यावरून परत्यामुळए आता लवकरच नवीन भाजप अध्यक्षांना मान्यता मिळू शकते असे मानले जाते.

यानिमित्ताने, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या निवडीत किती सक्रिय असेल? संघाची विचारधारा आणि भाजप यांचा जुना संबंध आहे. त्यामुळे संघाचा अप्रत्यक्ष प्रभाव किंवा सल्ला हा अध्यक्षपदाच्या निवडीत महत्त्वाचा असतो. भाजपमध्ये गेल्या काही वर्षांत निर्णयप्रक्रिया ही पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीभूत झाली आहे. त्यामुळे अंतिम निर्णय मोदी-शहा जोडीचाच निर्णायक ठरत असतो, हे अनेक वेळा दिसून आलं आहे.

भाजपच्या पुढील अध्यक्षांच्या नावांच्या चर्चे दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) कडून नागपूरहून एक स्पष्ट संदेश आला आहे की भाजपचा पुढील अध्यक्ष केवळ रणनीतीकार नसावा, तर वैचारिकदृष्ट्या मजबूत आणि संघटनेशी खोलवर जोडलेला असावा. आरएसएसला भाजपचा पुढचा अध्यक्ष तरुण आणि तळागाळातील असावा असे वाटते. तो थेट शाखा, प्रचारक आणि बूथ लेव्हल कार्यकर्त्यांशी जोडलेला असावा. त्याच्याकडे वैचारिक स्पष्टता असावी. समान नागरी संहिता (यूसीसी), लोकसंख्या नियंत्रण, शिक्षण आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद यासारख्या मुद्द्यांवर त्याचे स्पष्ट विचार असले पाहिजेत.

याशिवाय आरएसएसने काही गोष्टींची चिंताही व्यक्त केली आहे. जिंकण्याच्या इच्छेपोटी, भाजप अशा अनेक लोकांना पक्षात घेत आहे, ज्यांना सातत्याने विरोध होत आहे. तसेच इतरबाहेरील पक्षातून आलेले नेते आणि तंत्रज्ञांचा वाढता प्रभावही आरएसएसला आवडत नसल्याचे बोलले जात आहे. पक्षाच्या मूळ विचारसरणीला वैचारिकदृष्ट्या बळकटी देईल, असा व्यक्ती पक्षाचा नवा अध्यक्ष असावा, अशी आरएसएसची इच्छा आहे.

आरएसएस आणि भाजपमधील संबंध परस्पर संमती आणि संतुलनावर आधारित आहेत. मोदींची लोकप्रियता आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या रणनीतीमुळे गेल्या दशकात भाजपला अभूतपूर्व यश मिळाले आहे. परंतु २०२४ च्या निवडणूक निकालांनी हे दाखवून दिले आहे की आता विजयासाठी फक्त मोदींची प्रतिमा पुरेशी राहिलेली नाही. त्यासाठी पक्षाला वैचारिक दृढता आणि संघटनात्मक ताकदीवर लक्ष केंद्रित करावे लागेल, असेही संघ धुरीनांचे मत आहे.

२०२४ नंतर भाजपच्या अनेक राज्य घटकांमध्ये असंतोष वाढला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि पश्चिम बंगालमध्ये अंतर्गत मतभेद निर्माण झाले आहेत. नवीन अध्यक्षांनी हे मतभेद दूर करावेत आणि पक्षातील एकजूट ठेवावी अशी आरएसएसची इच्छा आहे. तसेच, त्यांनी संस्कृत शिक्षण आणि आयुर्वेदासारख्या सांस्कृतिक आणि सामाजिक मुद्द्यांना प्रोत्साहन द्यावे, असा विचार आरएसएसकडून व्यक्त करण्यात आला आहे.

आरएसएस हा भारतीय जनता पक्षाचा वैचारिक मार्गदर्शक आहे. अध्यक्षांच्या निवडीत आरएसएसची महत्त्वाची भूमिका बजावली आहे. परंतु उघडपणे हस्तक्षेप करत नाही. त्याऐवजी, ते भाजपच्या सर्वोच्च नेतृत्वाशी सल्लामसलत करते. नवीन अध्यक्षांनी संघटनेला स्वायत्तता द्यावी आणि कार्यकर्त्यांचा आवाज ऐकावा, असे आरएसएसला वाटते.

मोदी आणि शहा हे अजूनही भाजपचे सर्वात मोठे चेहरे आहेत. परंतु आरएसएसचा असा विश्वास आहे की पक्षाला आता दुसऱ्या फळीचे नेतृत्व तयार करावे लागेल, विशेषतः सप्टेंबर २०२५ मध्ये मोदी ७५ वर्षांचे होणार असल्याने. आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांनी अलीकडेच म्हटले आहे की ७५ वर्षांच्या वयानंतर सार्वजनिक जीवनात नवीन लोकांना संधी दिली पाहिजे. देशात याबद्दल अनेकांची नावे समोर आली होती. यातसंभाव्य उमेदवारांमध्ये नितीन गडकरी, भूपेंद्र यादव, मनोहर लाल खट्टर, शिवराज सिंह चौहान आणि निर्मला सीतारमण यांची नावे चर्चेत आहेत. इतकेच नव्हे तर, निर्मला सीतारमण, डी. पुरंदेश्वरी किंवा वनती श्रीनिवासन सारख्या पहिल्यांदाच एखाद्या महिलेला अध्यक्षपदासाठी बनवण्यास पाठिंबा देऊ शकते, असेही संकेत मिळत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर भाजपला पुढील काळात नवी दिशा देण्याचे संकेत आरएसएसने दिल्याचे दिसते. नवीन अध्यक्ष भाजपाला कोणत्या दिशेने घेऊन जातो? भाजप पक्ष संघटनेमध्ये मोदी शाह यांचे महत्त्व किती राहील? हे येणाऱ्या काळात अधिक स्पष्ट होईल. त्यासाठी काहीही प्रतीक्षा करावी लागणार..!

# शासन व जनतेच्या समन्वयातूनच समस्यांचे समाधान : आमदार लंघे

## शिरजगाव येथील समाधान शिबिरास चांगला प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : लोकहितासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व योजनांची अंमलबजावणी प्रशासन व जनतेच्या समन्वयातूनच शक्य आहे, असे प्रतिपादन आमदार विठ्ठलराव लंघे यांनी शिरजगाव येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात केले.

शिबिरात विविध प्रकारच्या दाखल्यांचे व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी आ.लंघे यांच्यासह उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय बिराजदार, नायब तहसीलदार संदीप चिंतामण, दत्तू पोटे, पांडुरंग लंघे, अंकुश काळे, प्रदीप ढोकणे, नवनाथ साळुंके, सुनील वाघमारे आदी उपस्थित होते.

आ. लंघे म्हणाले की, प्रशासन अधिकारी आणि जनतेचा समन्वय साधला तर कोणतीही अडचण राहणार नाही. त्यामुळे प्रत्येक गावात अशी शिबिरे राबवून शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणार आहोत. पाटील म्हणाले की, शिबिराचा मुख्य हेतू प्रत्येक नागरिकापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचवणे हा आहे. तुकडेबंदी कायद्यामध्ये सुधारणा केल्यामुळे आता घरकुलासाठी, विहिरीसाठी व शेतरस्त्यासाठी आवश्यक जागा सहज खरेदी करता येणार आहे.

घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्यात येणार आहे. स्मशानभूमीसाठी लागणाऱ्या



जागेची हस्तांतरण प्रक्रिया आता प्रांत कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातच पार पडणार आहे. यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्याची आवश्यकता उरलेली नाही. शाळेसाठी आवश्यक दाखले मिळण्यासाठी आता शाळेतच शिबिरे घेण्यात येणार असून, पोटखराब्याचे प्रश्न, जिवंत सातबारा, शेतीसाठी रस्त्याचा हक्क या सर्व बाबींसाठी प्रशासन सज्ज असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. प्रास्ताविक तहसीलदार डॉ बिराजदार यांनी केले. यावेळी मंडळातील सर्व अधिकारी लाभार्थी उपस्थित होते.

# कृषी कार्यानुभव उपक्रम कृषीदूतांसाठी उपयुक्त : सुडके



**नेवासा** : महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत कृषी महाविद्यालयातील चतुर्थ वर्ष कृषी विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन शेतकऱ्यांचे अनुभव व तज्ञांचे मार्गदर्शन घेण्यासाठी ग्रामीण कृषि कार्यानुभव हा उपक्रम घेतला जातो. हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व मौलिक असल्याचे प्रतिपादन मंडल नेवासा येथील कृषी अधिकारी लक्ष्मणराव सुडके यांनी केले.या उपक्रमांतर्गत कृषीदूतांनी मंगळापूर, प्रवरा संगम, खेडले काजळी गावातील शेतावर कृषीशास्त्रज्ञ डॉक्टर अशोकराव ढगे, सुडके यांच्या समवेत मका, सोयाबीन व कपाशी पिकांची पाहणी केली. कृषीदूत सुजित काळे, अभिषेक जगताप, मिहीर नेहरकर, रितेश मगर निखिल निकम व आकाश काळे यांनी शेतावर शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन चर्चा केली. डॉक्टर ढगे यांनी कृषी उत्पादन वाढीचे आधुनिक तंत्रज्ञान व त्याचबरोबर आर्टिफिशियल इंटेलिजन्स ड्रोनचा वापर, नवीन विद्राव्य खते यासंदर्भात माहिती दिली. सुडके यांनी मका पिकावरील अमेरिकन लष्करी अळी, कपाशीवरील रस शोषणाऱ्या मावा तुडतुडे, सोयाबीनवरील पाने खाणारी अळी यांची माहिती दिली. एकात्मिक कीटकनाशक व्यवस्थापन व खतांचा वापर यासंदर्भात अद्यापही शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. अभिषेक जगताप यांनी आभार मानले.

# इंग्रजी हस्ताक्षर सुधारण्यासाठी 'पॅनग्राम'ची नवसंजीवनी

## बेलापूरच्या शिक्षिका गायकवाड यांचा उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बेलापूर बुद्रूक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुली)येथे इंग्रजी हस्ताक्षर सुधारण्यासाठी राबवला जाणारा ङ्गपॅनग्रामम उपक्रम मुलींसाठी नवसंजीवनी ठरत आहे. शिक्षिका शीतल गायकवाड यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली राबवला जाणारा हा उपक्रम मुलींच्या हस्ताक्षराला आकर्षक आणि सुवाच्य बनवण्यात यशस्वी ठरत आहे. या उपक्रमामुळे मुलींना इंग्रजी हस्ताक्षराची गोडी लागली असून त्यांच्या आत्मविश्वासातही लक्षणीय वाढ झाली आहे.

ङ्गपॅनग्रामम ही संकल्पना इंग्रजी भाषेतील सर्व २६ अक्षरांचा समावेश असलेल्या वाक्यांवर आधारित आहे. यामध्ये छोटी-छोटी वाक्ये मुलींना लिहायला दिली जातात. या



वाक्यांच्या नियमित सरावामुळे मुलींच्या हस्ताक्षरात सुस्पष्टता, सुंदरता आणि एकसमानता येत आहे. गायकवाड यांनी सांगितले की, पॅनग्राममुळे मुली एकाच वेळी इंग्रजी अक्षरे, शब्द आणि वाक्यरचना शिकतात. शिवाय त्यांचे हस्ताक्षरही सुधारते. हा खेळकर आणि रंजक उपक्रम मुलींना आवडतो. मुलींना इंग्रजी लिहिताना अक्षरांचा आकार, रेषा आणि एकसमानता राखण्यात अडचण येत होती. यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होत होता. यावर उपाय म्हणून ङ्गपॅनग्रामम ही संकल्पना राबवायला सुरुवात केली.

ङ्गपॅनग्रामम उपक्रमाने बेलापूर बुद्रुक येथील मुलींच्या शाळेत एक सकारात्मक बदल घडवला आहे. हा उपक्रम केवळ हस्ताक्षर सुधारणाराच नाही, तर मुलींना इंग्रजी भाषेची गोडी लागण्यास आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणारा ठरला आहे. गायकवाड यांच्यासारख्या शिक्षकांच्या नावीन्यपूर्ण प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील मुलींचे भवितव्य उज्ज्वल होत असल्याची प्रशंसा पालकांनी केली.

# जिल्हा परिषद शाळेस शालेय साहित्यवाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : ज़िल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर करणे गरजेचे आहे. अपंग सामाजिक विकास संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुजारी वस्तीमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन गुणवत्ता वाढीस हातभार लावण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष संजय साळवे यांनी सांगितले.

दरवर्षी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याची परंपरा आहे अध्यापिका वर्षा गायकवाड राबवित आहेत. अशषा उपक्रमांमुळे पालक व विद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका हर्षदा पुजारी, संस्थेच्या सचिव वर्षा गायकवाड, अंगणवाडी सेविका रेखा पुजारी, झुंबर पुजारी, सविता पुजारी, वैशाली पुजारी, सायली पुजारी उपस्थित होते. या उपक्रमाचे बेलापूर खुर्द ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रणाली भगत यांनी विशेष कौतुक केले. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीपक गाढे व पालक गणेश जोशी यांनी उपक्रमास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप मान्यवराच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन भाग्यश्री वाबळे हिने केले.

तर आभार मृणालिनी क्षीरसागर हिने मानले.



# चक्रधर स्वामींचा पदस्पर्श दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : महाराष्ट्रभर भ्रमण करणाऱ्या चक्रधर स्वामी यांचा ७५६ वा पदस्पर्श पावन दिन भक्तीमय वातावरणाात साजरा करण्यात आला. यानिमित्त कीर्तन, भजन व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चक्रधर स्वामी यांच्या पदसस्पर्शाने पुनित झालेल्या लासूरगाव तीर्थक्षेत्र मानभाव आश्रम येथे चक्रधर स्वामी यांचा पदासस्पर्श दीन साजरा करण्यात आला यावेळी पंचक्रोशीतील भाविकांची उपस्थिती होती.प्रथमता श्रीमूर्ती मंगल स्नान झाल्यानंतर गंधाक्षदा, वस्त्र अर्पण, पुष्पहार विडा अर्पण करण्यात आला. भाविकांच्या उपस्थितीत महापूजा करण्यात आली. चक्रधर स्वामी यांच्या मूर्ती पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. साधुसंत व मान्यवरांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य प्रवेशडराचे फित कापून उदघाटन करण्यात आले. महंत रामचंद्र बाबा बिडकर यांच्या मार्गदर्शनखाली संचालिका डॉ रत्नप्रभा यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. अन्नदान पियूष शेट्टी, रोमा शेट्टी यांनी केले. याप्रसंगी संजय तिखे, माजी सरपंच रणजित देशमुख, गिरजीनाथ झिंजुर्डे, खुशाल कोठारी, आशिक पवार यांच्यासह भाविक उपस्थिते होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत काचोळे विद्यालय तालुक्यात अव्वल

## २५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील रयत शिक्षण संस्थेच्या डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालयातील इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीमधील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवले. विद्यालय तालुक्यात प्रथम क्रमांकावर आहे. आठवीच्या २४ तर पाचवीच्या एक विद्यार्थ्याने गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवून शिष्यवृत्ती मिळवण्याचा बहुमान पटकावला.

आठवीत भक्ती शिंदे, अनन्या कार्ले, अनुष्का धनेधर, अवनीश साळुंखे, भक्ती अभंग, कृतार्थ सोनवणे, लिशा त्रिभुवन, मानस भोसले, परम कुऱ्हे, प्राप्ती जाधव, प्रशांत अहिरे, पूर्वा भोगे, रुचिता बुधे, साई मुळे, समर्थ मुळे, संस्कार बोर्डे, सरताज शेख, शार्दुल ढवन, श्रद्धा बनकर, सोहम तांबडे, स्वानंदी कोबरणे, तनया जाधव, वैभवी साळुंखे, वेदिका चौथे या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. पाचवीमध्ये श्लोक छिल्लारे याने स्थान मिळवले.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांच्या मार्गदर्शनाखालीच विद्यालयाचा गुणात्मक विकास चालू आहे. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये उत्तर विभागीय गुणवत्ता कक्ष, मार्गदर्शक शिक्षक व पालक यांचा मोलाचा वाटा आहे. नियमित जादा तास, वर्षभर झालेल्या सराव परीक्षा, तज्ञ विषय शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यालयाच्या सुयोग्य नियोजनामुळे निश्चित यश मिळत असल्याचे मुख्याध्यापक सुनील साळवे यांनी सांगितले.

यशस्वी विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षक यांचे मीनाताई जगधने, जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम, मुख्याध्यापक साळवे, पर्यवेक्षक सूर्यकांत सराटे, वसतिगृहाचे अधीक्षक महेंद्र भराड, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना शिक्षक कालंगडे ए. एस., तनुजा बोरावके, खैरे डी. बी., नन्नावरे एस. जी., लोंढे बी. डी., धनवडे डी. डी., गेडाम एन. एन., मुठे एन. पी., घावटे एम. एस., गागरे व्ही. एन., श्रद्धा निबे, रंजना कदम , गोरक्षनाथ आंबेकर, सुनील खाडे, निकम आर. बी., जोशी आर्. एस., नन्नावरे एस. जी. यांचे मार्गदर्शन मिळाले.

# विजेच्या समस्या सोडविण्यासाठी कोल्हारकरांचे निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : कोल्हार भगवतीपूर गावात वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत व्हावा, व्यावसायिक वीजधारकांना सौरवीज अनुदानाचा लाभ मिळावा, विजेच्या कमी-जास्त दाबामुळे वीज उपकरणांचे होणारे नुकसान होते. योग्य दाबाने वीजपुरवठा व्हावा या व इतर मागण्यांसाठी काल (सोमवार) येथील टपरीधारक, व्यापारी संघटना, शेतकरी व ग्रामस्थांच्यावतीने देवळाली प्रवरा येथील महावितरणाच्या उपविभागीय कार्यालयात जाऊन उपकार्यकारी अभियंता एस. एच. बागरे यांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, व्यवसायिक व घरगुती मीटर धारकांच्या बिलातील स्थिर आकार रद्द करावा, मुळा प्रवरा सोसायटीचे जुने स्ट्रक्चर बदलावे, स्मार्ट मीटर बसवताना मीटरधारकांची परवानगी घ्यावी, तिसगाववाडी येथील फिडर पूर्ण क्षमतेने चालत नसल्याने शेतकऱ्याला पूर्ण दाबाने वीज मिळत नाही. त्यामुळे शेतकरीवर्गाचे होणारे वीज पंपाचे नुकसान टाळण्यासाठी तिसगाव फिडरवरून योग्य दाबाने वीजपुरवठा व्हावा व



**कोल्हार भगवतीपूर : येथील टपरीधारक व व्यापारी संघटना, शेतकरी व ग्रामस्थांच्यावतीने देवळाली प्रवरा येथील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात जाऊन व्यापारी व शेतकरी यांनी उपकार्यकारी अभियंता बागरे यांना निवेदन दिले. (छाया :गणेश कुंभकर्ण)**

शेतकऱ्यांच्या वीज पंपाचे होणारे नुकसान टाळण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी शिवकुमार जंगम, कांकरिया, उमर शेख, महेश तुषार बोऱ्हाडे, अनिल फलटणे, संतोष जंगम, शुभम सुरसे, निलेश घुले आदीसह व्यापारी व शेतकरी उपस्थित होते. २ जुलैसा व्यापारी असोसिएशन व टपरीधारक तसेच शेतकरी व ग्रामस्थ यांची बैठक येथील माधवराव खर्डे पाटील चौकात झाली होती. यावेळी अधिकाऱ्यांना जाब विचारण्याचा व निवेदन देण्याचा निर्णय घेतला होता.

बागरे यांनी निवेदन स्वीकारले. एक ऑगस्टपर्यंत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम केले जाईल तसेच इतर मागण्या वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार करून पाठपुरावा करू, असे सांगितले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाळासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Balasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818

# दिव्यांग भवनाचे काम लवकरच सुरू होणार : आ. खताळ

## दिव्यांगांना साहित्य व प्रमाणपत्रांचे वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : येथे दिव्यांग भवन व्हावे ही अनेक दिवसाची दिव्यांगांची मागणी होती. त्यानुसार नग पालिकेने नेहरू गार्डनजवळ जागा उपलब्ध करून दिलेली आहे. दिव्यांग भवनाचे काम लवकरच सुरू होणार असल्याचा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला.



शहरातील गणेशनगर येथील योग भवनात दिव्यांग बांधवांसाठी कृत्रिम हात-पाय कॅलिपर्स बसविणे तसेच दिव्यांग प्रमाणपत्र आ. खताळ यांच्या हस्ते वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजकुमार जऱ्हाड वैद्यकीय अधिकारी संदीप कचेरिया, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, शहरप्रमुख दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, आरपीआयचे शहराध्यक्ष कैलास कासार, दिव्यांग साह्यसेनेचे जिल्हाध्यक्ष जालिंदर लहामगे, वडगावपानचे सरपंच श्रीनाथ थोरात यांच्यासह मान्यवर उपस्थित होते

आ. खताळ म्हणाले की, माझ्या राजकीय प्रवासात संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून काम करण्याची मला संधी मिळाली आणि त्यातूनच दिव्यांग बांधवांच्या गरजांची खरी ओळख झाली आहे. यापूर्वी केंद्र सरकारच्या माध्यमातून माजी खा. डॉ. सुजय विखे यांनी संगमनेर तालुक्यात वयोश्री योजनेच्या माध्यमातून लाखो ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग बांधवांपर्यंत पोहोचलो. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे जरी अहिल्यानगरचे पालकमंत्री असले तरी त्यांनी संगमनेर तालुक्याचे पालकत्व घेतले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य पुढे आणखी गतिमानतेने सुरू राहणार आहे. शासनाच्या अनेक योजना पारदर्शकतेने आपण राबवत आहोत. कुणाला कोणत्याही कामासाठी पैसे देऊ नका. त्यासाठी माझेआणि पालकमंत्र्यांचे कार्यालय, तसेच विळद फाउंडेशन तुमच्या साठी नेहमीच खुले राहील.

आपण फक्त निवडणुकीपुरते राजकारण करत असतो. निवडणुका संपल्या की समाजकारण करतो. दिव्यांग, वंचित आणि गरजवंतांना न्याय मिळावा, तसेच त्यांना त्यांच्यासाठी शासनाच्या आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत पोहोचवली जावी हा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील. दिव्यांग बांधवांचे माझ्यावर प्रेम आहे तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळेच मी या तालुक्याचा आमदार झालो आहे. त्यामुळे तुम्हाला जेव्हा काही अडचणी येतील त्या वेळी तुमचा भाऊ, तुमचा मुलगा २४ तास तास तुमच्या पाठीशी भक्कम उभा राहील असा विश्वास आ खताळ यांनी यावेळी दिला.

सूत्रसंचालन शिवसेनेचे उपशहरप्रमुख अजित जाधव यांनी केले तर आभार शिवसेनेचे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी मानले केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन आणि दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत शिबिरात १२७ दिव्यांग बांधवांनी नोंद केली होती त्या पैकी ८२ जणांना कॅलिपर्स मंजूर झाले होते. त्यातील १० जणांचे नामंजूर केले. ७२ जणांना तसेच ४१ दिव्यांग बंधू-भगिनींना प्रमाणपत्र आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

# सेवानिवृतांचे प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य करू : मंत्री राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न सोडविणेसाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यासमवेत बैठक घेण्यात येईल. असे आश्वासन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले असल्याची माहिती तालुकाध्यक्ष के. टी. वाघ यांनी दिली.



पेन्शन विक्री कालावधी कमी करणे, केंद्रीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे पेन्शन सोबत मेडिकल अलौनस मिळणे. उत्कृष्ट कामाबाबत आगावू वेतनवाढ मिळणे, यशवंत पंचायराज अभियानांतर्गत गौरविण्यात आलेल्या गुणवंत अधिकारी आणि कर्मचारी यांना दोन आगावू वेतनवाढ देणे. अशा संघटनेच्या मागण्या आहेत. कार्याध्यक्ष भाऊसाहेब कवाडे, सचिव शशिकांत अमोलीक, खजिनदार अनिल मिरीकर, प्रसिद्धी प्रमुख एम. एम. शेख, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र मोरगे, शेख इब्राहिम उपस्थित होते.

# थोरातांनी घेतली पवार व पिंजारी कुटुंबियांची भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : भूमिगत गटार दुर्घटनेत मृत पावलेल्या अतुल पवार व जावेद पिंजारी यांच्या कुटुंबियांची काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी भेट घेऊन सांत्वन केले आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून या दोन्ही कुटुंबांना तातडीने जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचे त्यांना आश्वासित केले.



त्यांच्यासमवेत मा. आ. डॉ. सुधीर तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, विश्वासराव मुर्तडक, नितीन अभंग, निखिल पापडेजा, गणेश मादास,जावेद पठाण, लाला बेपारी, अंबादास आडेप, वैष्णव मुर्तडक, किशोर टोकसे उपस्थित होते. थोरात म्हणाले की, झालेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. नगरपालिका प्रशासनाचा निष्काळजीपणा, तसेच काम अपूर्ण असताना या युवकांना स्वच्छतेसाठी पाठवण्याची गरज नव्हती. अतुलला वाचवण्यासाठी जावेद हा पुढे सरसावला. त्या दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दोन्ही कुटुंबियांना शासनस्तरावरून जास्तीत जास्त मदत मिळून देण्यासाठी मुख्यमंत्री व सरकारकडे आपण पाठपुरावा करून यांना तातडीने मदत मिळवून देऊ.

# पुणतांबा-जळगाव रस्त्याची दयनीय अवस्था

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : परिसरातील पुणतांबा, जळगाव, चांगदेवनगर, रामपूरवाडी, येलमवाडीसह अनेक गावांतील ग्रामस्थांना दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या पुणतांबा -जळगाव या अंदाजे अडीच किलोमीटर लांबीच्या रस्त्याची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती झाली नाही तर आगामी स्थानिक



स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीवर वेळप्रसंगी बहिष्कार घालण्याचा इशारा काही ग्रामस्थांनी दिला आहे. ब्रिटीश काळातील या रस्त्यांची रुंदी नकाशाप्रमाणे अंदाजे ६६ असून सध्या रस्त्याची रुंदी अनेक ठिकाणी लगतच्या शेतकऱ्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे काही ठिकाणी अवधी सहा फूट आहे. २०१२ मध्ये तात्कालि तहसीलदार अप्पासाहेब शिंदे यांनी पुढाकार घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. १ किलोमीटर काम झाल्यावर काही शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्यावर काम बंद पडल होतं. आजही रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय असून ठिकणिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यांमुळे येणाऱ्या-जाणाऱ्या ग्रामस्थ व वाहनचालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे रस्त्याची तागडीने दुरुस्ती झाली नाही तर धडक आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# धरणात उडी मारलेल्या आरोपीचा बुडून मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : पोलिस पथक पकडायला आल्याची चाहूल लागताच दोन तरुणांनी तालुक्यातील वावरथ परिसरात मुळा धरणाच्या पाण्यात उडी मारली. दोघांपैकी एकजण पोहून बाहेर निघाला. मात्र रामा माळी हा तरुण पाण्यात बूडाला. चार दिवसानंतर त्याचा मृतदेह फुगून पाण्यावर तरंगताना दिसून आला.

लक्ष्मीबाई भागवत बाचकर (वय ६५ वर्षे, रा. जांभळी, ता. राहुरी) व त्यांचा मुलगा अंबादास हे दोघे त्यांच्या घरात झोपी गेले होते. ९ जुलै रोजी १२.३० वाजे दरम्यान तीन भामटे बाचकर यांच्या घरात घुसले आणि लक्ष्मीबाई बाचकर यांच्या गळ्यातील सोन्याचे डोरले व कानातील फूले ओरबाडून घेतली. तसेच पेटीतील सोन्याचे चार तोळ्याचे दागिने घेऊन पळून जात होते. लक्ष्मीबाई यांच्या मुलाने त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता भामट्यांनी त्यांना काठीने मारहाण करून ते पसार झाले होते. लक्ष्मीबाईनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी रवि (पूर्ण नाव माहीत नाही, रा. जांभळी, ता. राहुरी) व त्याचे सोबतचा एक अनोळखी इसम अशा दोन जणांवर गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

१० जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेदरम्यान पोलिस पथक आरोपींचा शोध घेण्यासाठीच वावरथ येथे गेले. तेव्हा पोलीस पकडायला आल्याची चाहूल लागताच रामा ज्ञानदेव माळी (वय २९ वर्षे) व संदिप बर्डे, (वय २७ वर्षे, रा. गंगाधरवाडी, वावरथ जांभळी, ता. राहुरी) या दोन तरुणांनी मुळा धरणाच्या पाण्यात उडी मारली. दोघांपैकी बर्डे हा पोहून बाहेर आला. मात्र रामा माळी पाण्यात बुडाला. पोलिस प्रशासनाने सलग तीन दिवस धरणाच्या पाण्यात त्याचा शोध घेतला. मात्र तो मिळाला नाही. काल (दि. १३) त्याचा मृतदेह धरणाच्या पाण्यावर तरंगताना दिसून आला. पोलिस प्रशासनाने मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. पोलीस ठाण्यात आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान फडोळ हे करीत आहे.

# धर्म आराधनेसाठी प्रत्येकाने प्रवृत्त व्हावे : सत्यसाधनाजी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : यापूर्वी समाज जोडण्यासाठी व कार्यक्रमाच्या प्रवचनाची माहिती देण्यासाठी ग्रामपंचायत दवंडी देत असत. त्यानंतर ध्वनिक्षेपकाच्या साह्याने तर आजच्या प्रगतीच्या युगात मोबाईलचा वापर केला जात आहे. प्रत्येकाने प्रपंचाची दलाली करताना धर्माची दलाली करून धर्मस्थानात धर्म आराधनेसाठी प्रवृत्त व्हावे, असा उपदेश दिवाकर सांप्रदायाच्या उपप्रर्वर्तिनी डॉ. सत्यसाधनाजी महाराज यांनी जैन स्थानकामध्ये चातुर्मासार्थ सुरू असलेल्या प्रवचनातून दिला.



सत्यसाधनाजी म्हणाल्या की, धर्मात कोणाशीही वैर ठेवू नका. स्वयंम आत्म्याची निर्जरा करण्यासाठी धर्माशी नाते जोडा. श्री भगवान महावीरांनी कोणाशीही वैर केले नाही. त्यांच्याबद्दल कोणीही वैर भावना ठेवली नाही. महावीरांचे शासन सुरू आहे. त्यामध्ये जोडण्यासंबंधी धर्मकार्यासाठी अनुमोदन देऊन धर्मध्यान, तपसाधना करण्यासाठी एकसंघ होून जीवन आनंदी बनवा.

पू. अर्हतज्योतीजी म्हणाल्या की, आत्म्यात परमात्म्याशी जोडण्यासाठी सामाईकची धर्मसाधना दररोज करून जीवनाची वाटचाल मोक्षाकडे न्या. चातुर्मासमध्ये धर्म आराधना तप, साधना, जाप आदी केल्याने चातुर्मास केल्याचे सार्थक होईल. संत महात्म्यांचे आशीर्वादाचा हात आहे. धर्मस्थानासाठी जो वेळ देईल, तो धर्माचा लाभ घेईल. त्यास एनीटाईम लाभाची अनुभुती होईल. पू. तन्मदर्शनाजी म्हणाल्या की, जीवनात शेवटच्या क्षणापर्यंत कोणीही साथ देत नाही. तेथे फक्त धर्माचीच साथ मिळते. जीवनात संत होवू शकत नसाल तर हरकत नाही. परंतु शांत व सरळ स्वभावी बना. धर्मस्थानकात एकमेकांचे उणेदुणे करण्यासाठी जाऊ नका. धर्म आराधना करण्यासाठी जा. जीनवाणीचे श्रवण करून अंतर चक्षु उघडून काय प्राप्त झाले. याचे चिंतन करा, असे आवाहन केले. यावेळी पू. हितसाधनाजी, पू. गुरूछायाजी, पू. सौम्यज्योतीजी या साध्वीजी उपस्थित होत्या.

# चिकन-मटन मार्केटसाठी स्वंतत्र जागा द्यावी

## लोणीच्या ग्रामस्थांचे मंत्री विखे यांना निवेदन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : लोणी खुर्द गावामध्ये चिकन, मटन मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ आणि जनसेवा मंडळाच्या वतीने पालकमंत्रीराधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी लोणी खुर्द गावामध्ये चिकन विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकाकडून घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी एकत्रित येऊन याविरोधात ग्रामपंचायत तसेच पोलिस प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. हिंदु समाजाच्यावतीने मोर्चा काढून संबधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. श्रीकिसन आहेर, डॉ. सुनील आहेर, सुधीर आहेर, सचिन आहेर, राहुल घोगरे, साहेबराव आहेर, सुहास घोगरे, किरण दत्तात्रय आहेर, विजय मापारी, जालिंदर आहेर, बंटी घोगरे, सुधाकर आहेर, मनोज लोखंडे, अमोल तुपे, संदिप घोगरे, किरण आहेर, संजय आहेर, प्रतिक कदम, अनिल जाधव, संदिप आहेर, जालिंदर मापारी, मुन्ना ब्राम्हणे, योगेश आहेर आदी निवेदन देतेवेळी उपस्थित होते. लोणी खुर्द गावामध्ये चिकन, मटन मार्केटसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करुन द्यावी, तसेच हा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांना नियमांचे बंधन घालण्याबाबतचे आदेश प्रशासनाच्या माध्यमातून द्यावेत अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

## दखल

### अतिथी कॉलनीत सेवानिवृत्त शिक्षकांचे गुरूपूजन

**शिरसगाव** : अतिथी कॉलनीतील अमृतेश्वर शिव मारुती मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त सेवानिवृत्त प्राचार्य प्रकाश देशमुख, सुभाष लिंगायत, प्रा. हंबीरराव नाईक. सेवानिवृत्त शिक्षिका प्रतिमा गंधे याचा सन्मान करण्यात आला. गुरूपूजन प्रदीप आखेगावकर व सुर्वणा आखेगावकर यांनी केले. प्राचार्य देशमुख म्हणाले की, आम्ही सन्मानाने भारावून गेलो आहोत. प्रा. नाईक म्हणाले की, ही आपली संस्कृती आहे. कॉलनीतील एकी, प्रेम व आदरभाव म्हणजे अमृतेश्वरची कृपा होय. यावेळी नागरिकांसह विद्यार्थी उपस्थित होते.

### चोऱ्यांचा तपास न लावल्यास उपोषण : बागवान

**नेवासा** : भुरट्या चोऱ्यांना आळा घालण्यात पोलिसांना अपयश आले असून चोऱ्यांचा तपास लावावा या मागणीसाठी पोलीस स्टेशनसमोर उपोषण करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे गफूर बागवान यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना पाठवलेल्या निवेदनात दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, शहरासह परिसरात भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. चोऱ्यांचा तपास पोलिसांनी लावावा म्हणून वारंवार मी पोलिसांकडे मागणी केली. मात्र त्याकडे सतत दुर्लक्षच करण्यात आले. शेतातील खोलीतून माझा दिड लाखाचा कापूस चोरीला गेला, विहिरीतील मोटार चोरीला गेली. मात्र त्याचा तपास लागलेला नाही. अज्ञात चोरांना शोधून त्यांच्यावर कारवाई करावी अन्यथा उपोषणास बसणार अससल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### 'मर्चंटस क्रेडिट'च्या संचालकांची बिनविरोध निवड

**सोनई** : माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या नेवासा तालुका को-ऑपरेटिव्ह मर्चंट क्रेडिट सोसायटीच्या सन २०२५ ते २०३१ पर्यंत नवनिर्वाचित संचालकपदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. नवनिर्वाचित संचालक असे-प्रदीप वाकचौरे, अनिल शिंदे, भानुदास कर्जुले, एकनाथ गाडेकर, पंडित खाटीक, विजय खंडागळे, संजय नांदे, नंदू कनगरे, भाऊसाहेब होंडे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एस. व्ही. ठोंबरे व सहाय्यक निवडणूक अधिकारी सुभाष सरोदे यांनी कामकाज पाहिले. नूतन संचालकांचे शंकरराव गडाख, जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुनील गडाख, सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर, तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक, तालुका सचिव आप्पासाहेब बोर्डे यांनी अभिनंदन केले आहे.

### नेवासा रस्त्यावरील बंधाऱ्यात पाणी सोडले

**टाकळीभान** : भोकर येथील बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले असून, यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यासाठी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली तसेच अशोक साखर कारखान्याचे संचालक नीरज मुरकुटे यांनी प्रयत्न केले. पाण्याचा लाभ शेतकऱ्यांच्या शेतीला मिळणार असून, पिकांना आधार मिळणार आहे. बंधाऱ्यात पाणी आल्याने जमिनीतील आर्द्रता टिकवून ठेवण्यास मदत होईल. यासाठी स्व. ऋषिकेश छल्लारे फाउंडेशनने पुढाकार घेतल्याने स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी मुरकुटे कुटुंहाटे व ऋषिकेश छल्लारे फाउंडेशन यांचे आभार मानले आहेत.

### चैतन्य उद्योग समूहास आयकर आयुक्त केसरी यांची भेट



**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील चैतन्य उद्योग समूहास क्रविवारी पुणे येथील आयकर विभागाचे आयुक्त अजय केसरी यांनी कुटुंबातील सदस्यांसह भेट दिली. यावेळी चैतन्य उद्योग समूहाचे अध्यक्ष गणेश भांड यांच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. केसरी यांनी चैतन्य मिल्क अँड ऍग्रो फार्म व चैतन्य एक्का व प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी चैतन्य एक्काचे अध्यक्ष संदीप भांड, पत्रकार संजय हुडे, विलास भालेराव, गणेश डावखर अबूबकार शेख, सुभाष कांबळे, किशोर साळुंके आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

# गांधी जयंतीपासून कामगारांचे उपोषण : बोर्डे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** रशेती महामंडळाच्या १४ मळ्यांवरील कामगारांच्या प्रलंबित मागण्यासाठी निर्णय न झाल्याने २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीदिनी शेती महामंडळाच्या पुणे येथील मुख्यालयासमोर महिनाभर प्रत्येक मळ्यावरील कामगारांनी अन्नत्याग करून दिन दिवस उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती रविवारी श्रीरामपूर येथे झालेल्या मेळाव्यात देण्यात आली. तशी घोषण शेती महामंडळ कामगार लढा कृती समितीचे अध्यक्ष बाबासाहेब बोर्डे यांनी केली.



राज्य शासनाकडे व शेती महामंडळकडे वेळोवेळी मागणी करूनही कामगारांना २ गुंठे जागा व घरे बांधून देण्याचा निर्णय अद्याप शासनाकडून झाला नाही. म्हाडामार्फत घरे बांधून देण्याचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात कामगार संघटनेबरोबर राज्य सरकारने चर्चा केली नाही. शेती महामंडळकडे असलेल्या जमिनी संयुक्त शेती करार पद्धतीने दिल्या. महामंडळचे रोजंदार कामगार यांना कामावर घ्यावे, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाचा फरक मिळावा. सहावा वेतन आयोग लागू करावा, रोजंदार कामगारांच्या ग्रॅच्युटीच्या रकमा मिळाव्यात व थकीत ९९ कोटी ५० लाख रुपये मिळावेत आदी मागण्यांसाठी आंदोलन होईल. मेळाव्यात सरचिटणीस सुभाष कुलकर्णी कामगार नेते अविनाश आपटे, भालचंद्र शिंदे, भिकन शिंदे, एस. के. सय्यद, बाबूलाल पठाण, अशोक पाटील, उत्तम राजगुडे, अशोक पाटील, भालचंद्र कोल्हटकर, सुधाकर चव्हाण, कारभारी त्रिभुवन आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी राज्यातील ५०० शेती महामंडळ कामगार उपस्थित होते.

# घरकुलांचे रखडलेले अनुदान लवकरच मिळणार : आ. विठ्ठलराव लंघे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नगरपंचायत हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुल लाभार्थ्यांना तब्बल १ कोटी ५४ लाख रुपयांचे रखडलेले अनुदान लवकरच वर्ग होणार असल्याची माहिती आमदार विठ्ठलराव लंघे यांनी दिली.

अनेक दिवसांपासून रखडलेले हे अनुदान अखेर आ. लंघे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा व प्रयत्नांमुळे मोकळे झाले असून, शेकडो लाभार्थ्यांच्या प्रतीक्षेला आता पूर्णविराम मिळणार आहे. नगरपंचायतीच्या पहिल्या टप्प्यात ३२४ घरकुले मंजूर झाली होती. यामध्ये १८२ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून १४२ घरकुले प्रगतीपथावर आहेत. या सर्व घरकुल लाभार्थ्यांचे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ टप्प्यातील अनुदान रखडलेले होते. ही बाब लक्षात घेऊन आमदार लंघे यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन प्रत्यक्ष निवेदन दिले. यावेळी शिंदे यांनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ आदेश देऊन कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार ही रक्कम म्हाडामार्फत लवकरच नगरपंचायतीकडे वर्ग होणार आहे आणि त्यानंतर थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होईल, असे आ. लंघे म्हणाले.

दुसऱ्या टप्प्यातील ४४ नव्या घरकुल प्रकल्पांनाही मंजुरी मिळाली असून, त्याची प्रक्रिया लवकरच सुरू केली जाणार आहे. दरम्यान, तुकडेबंदी कायद्यामुळे निर्माण झालेली अडचण महसूलमंत्री बावनकुळे यांनी तुकडेबंदीतील अट शिथिल करून घरासाठी आवश्यक जागा खरेदी करण्यास परवानगी दिली आहे. अट शिथिल करण्याच्या निर्णयामुळे अनेकांचे घरकुलाचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरू शकणार असून, रखडलेली कामे पूर्णत्वास जातील, असा विश्वासही आ. लंघे यांनी व्यक्त केला.

## पान १ वरुन

### पालिकांचे प्रभाग अन् आरक्षण जाहीर

अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचनेची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा २२ ते २८ ऑगस्ट २०२५ दरम्यान प्रसिद्ध होईल, ज्यामध्ये नागरिकांना हरकती आणि सूचना मांडण्याची संधी मिळेल. यानंतर, प्राप्त हरकतींचा विचार करून अंतिम प्रभाग रचना ३ ते ६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान राजपत्रात प्रसिद्ध केली जाईल.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि राज्य निवडणूक आयोग यांच्यामार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. निवडणूक आयोगाने लोकसंख्येच्या आधारावर प्रत्येक नगर परिषद आणि नगरपंचायतीसाठी सदस्य संख्या आणि आरक्षण निश्चित केले आहे.

### निवडणुकांचे पडघम...


नवी प्रभाग रचना आजपासूनच लागू करण्यात आली आहे. संबंधित क्षेत्रातील रहिवाशांनी सूचना अथवा हरकती असल्यास त्या २१ जुलै २०२५ पर्यंत लेखी स्वरूपात जिल्हाधिकारी कार्यालयात सादर कराव्यात. यानंतर प्राप्त होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

जिल्हाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचा विचार करून अंतिम रचना जाहीर करण्यात येईल. शासनाच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया पारदर्शक व लोकशाही मूल्यांनुसार पार पाडली जाणार आहे.

### सामाजिक न्याय विभागाच्या १५०० कोटींच्या टेंडरचा घोटाळा?

आणि विना-टेंडर काम याची चौकशी व्हावी. ही बाब सामाजिक न्याय विभागातील पारदर्शकतेचा आणि सार्वजनिक निधीच्या विश्वासार्ह वापराचा गंभीर प्रश्न आहे. कृपया त्वरित लक्ष द्या आणि कठोर कारवाई करा. अशी मागणी विजय कुंभार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# अन्यायाविरोधात होमिओपॅथी डॉक्टरांचे प्रशासनाला निवेदन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : होमिओपॅथीमधील ज्या डॉक्टरांनी महाराष्ट्र शासनाने तयार केलेला सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी पूर्ण केला आहे, त्यांना महाराष्ट्र वैद्यक परिषदेत नोंदणी करण्याचा अधिकार मिळावा. दोन्ही सभागृहात घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होण्यास सुरुवात होणार असताना राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना नोंदणीकृत करण्याच्या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशनने विरोध दर्शविला आहे. या विरोधाच्या भूमिकेमुळे होमिओपॅथी डॉक्टरांवर अन्याय होत असल्याचा आरोप असोसिएशनने केला. इमाच्या भूमिकेमुळे शासनाने घेतलेला निर्णय रखडला आहे. होमिओपॅथी डॉक्टरांना अधिक वेठीस न धरता शासनाने निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करून श्रीरामपूर होमिओपॅथी डॉक्टर असोसिएशनच्यावतीने मागण्यांचे निवेदन महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदन देतेवेळी सवश्रीडॉ. मोहन कडणोर, ललित सावज, वैभव निकम, नवनीत जोशी, मच्छिंद्र त्रिभुवन, सुदर्शन रानवडे, आशिष जयस्वाल, राहुल पडवळकर, शफी शेख, विनायक सलालकर, भूषण लाहोरे, मच्छिंद्र निर्मळ, संदीप पठारे, संजय अबक, विशाल भालेराव, कुणाल कोळसे, रत गिडवाणी, दीपाली जयस्वाल, अश्विनी त्रिभुवन, माधुरी रानवडे, भारत काळे, विक्रांत खरात, अतुल शिंदे, सुहास दौले, प्रवीण देसाई, उज्ज्वल धुमाळ, गणेश कुंदे, मुजाहिद सैय्यद, नानासाहेब भोसले, आदेश वकचौरे, महेंद्र मिरीकर, नितीन मगर, शीतल महाले, पूनम शिंदे, रवींद्र पवार, अरबाज पठाण, अविनाश गायकवाड, अभिजीत चव्हाण, आरिफ शेख, सलीम शेख, अदनान मुसानी, महेश शरणागत, सरफराज मेमन, बाबासाहेब पिसाळ आदी उपस्थित होते.

# निसर्गाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने एक झाड लावावे : हर्ष तनपुरे

## एक पेड मा के नामांतर्गत राहुरी महाविद्यालयात कार्यक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**राहुरी** : एक पेड मा के नाम योजना यशस्वी करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने एक झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. ज्याप्रमाणे आईशी आपले घट्ट नाते असते तसेच एक झाड लावून प्रत्येक विद्यार्थ्यांनी त्या झाडाशी आपले नाते अधिक घट्ट केले पाहिजे. निसर्ग मानवाला खूप काही देत असतो याची जाण ठेवून आपण निसर्गाचे काहीतरी देणं लागतो या कृतज्ञच्या भावनेतून प्रत्येक विद्यार्थ्यांने पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी किमान एक तरी झाड लावावे, असे आवाहन हर्ष तनपुरे यांनी केले आहे.

लोकनेते कै. रामदास पाटील धुमाळ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातराष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व एच.डी.एफ.सी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक पेड मा के नाम अभियानांतर्गत कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ तनपुरे साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, माजी उपनगराध्यक्ष अशोक आहेर, महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. डॉ. अनिता वेताळ-अंत्रे, उपप्राचार्य मंजाबापु उऱ्हे, बँकेचे शाखा प्रबंधक भाऊसाहेब वांढेकर व विद्यार्थ्यांच्या हस्ते महाविद्यालयीन परिसरात वेगवेगळ्या प्रकारच्या १०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. तनपुरे म्हणाले की, वाढत असलेली उष्णता आणि अनियमित पाऊस यावर वेळीच नियंत्रण मिळविण्यासाठी वृक्षलागवड करणे आवश्यक आहे. आपण लावलेलं एक झाड महाविद्यालयाच्या वैभवात निश्चितच भर टाकेल. वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवून आपल्याला शुद्ध हवा मिळणे आवश्यक आहे. शुद्ध हवा व तापमान नियंत्रणासाठी प्रत्येकाने एक झाड लावून निसर्गाला नवसंजीवनी द्यावी.

वांढेकर म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक झाड लावून निसर्गाशी आपले नाते अधिक घट्ट केले पाहिजे. झाडे लावा झाडे जगवा असा संदेश यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. प्राचार्या डॉ. वेताळ-अंत्रे यांनी पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपणाची गरज असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी बँकेचे हनुमंता कल्हापुरे, फिरोज शेख, ज्ञानेश्वरी म्हसे तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ .दत्तात्रय खिलारी, प्रा. डॉ. अमोल गायकवाड, प्रा. डॉ. योगिता मोरे, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी प्रा. संदीप पेरणे यांनी परिश्रम घेतले.

# प्रश्न सोडवण्यासाठी सेवानिवृत्त शिक्षकांना खा. लंके दिल्लीला नेणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक पेन्शनर्स असोसिएशनचे शिष्टमंडळ विविध मागण्यांसाठी १९ जुलै रोजी दिल्लीला जाणार असल्याची माहिती उत्तर जिल्हा प्रमुख अशोक बागूल, जिल्हाध्यक्ष द. मा. ठुबे यांनी दिली आहे. खासदार डॉ. निलेश लंके यांच्या नेतृत्त्वाखाली जिल्ह्यातील १५० सेवा निवृत्त शिक्षक दिल्ली येथे जात आहेत. एप्रिल महिन्यामध्ये खासदार लंके यांनी अहिल्यानगर येथे शिक्षकांचा मेळावा घेतला होता. या मेळाव्यामध्ये त्यांनी शिक्षकांच्या बऱ्याचशा अडीअडचणी समजून घेतल्या होत्या. त्यांचे वडील ज्ञानदेव लंके हे निवृत्त शिक्षक असल्याने त्यांच्या अडचणी ते जाणून होते. तेव्हा त्यांनी आश्वासन दिले की, तुम्हा सर्वांना दिल्ली येथे घेऊन जातो व केंद्रीय मंत्र्यंसमोर तुमचे प्रश्न मार्गी लावतो. दिलेल्या शब्दाप्रमाणे लंके यांनी संपूर्ण खर्चाचा भार उचलून सर्व शिक्षकांना ते दिल्ली येभे घेऊन जात आहेत.

दिल्लीलाला जाऊन ते निवृत्त शिक्षकांच्या मागण्या मांडणार आहेत. निवृत्त शिक्षकांचे वय वर्षे ६५ नंतर त्यांना ५ टक्के वाढ मिळावी व ७५ वर्षांवरील शिक्षकांना १० टक्के वाढ मिळावी. पेन्शन विक्रीची वर्षे १५ ऐवजी १२ करावीत, असे न्यायालयाचे आदेश असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सेवा निवृतींसाठी स्वतंत्र मंत्रालय विभाग असावा व त्या खात्याच्या स्वतंत्र मंत्री असावा. सेवानिवृत्तांना रेल्वेत ५० टक्के सवलत मिळावी. त्याचप्रमाणे औषधोपचारांसाठी पाच लाखापर्यंत कॅशलेस विमा सरकारने द्यावा आदी मागण्यांसाठी हे शिष्टमंडळ खासदार शरद पवार यांच्यासमवेत राष्ट्रपती दौंपदी मूर्म, पतंप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन, यांची समक्ष भेट घेऊन शिक्षकांच्या प्रश्नावर चर्चा करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष ठुबे, उबाळे, रावसाहेब पवार, भा. क. गोरे, विनायक कोल्हे, सु. पा. वांढेकर, बापूसाहेब कर्पे, अशोक ढगे, श. धो. इथापे, संपत सोनवणे, रामचंद्र ठोंबर, शिवाजी गोसावी, राजू थोरात, सुरेश तडके, उत्तम शेलार, सुरेश कांबळे आदींनी सांगितले.

# दिव्यांग मुलांच्या पालकांना कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्राचे वितरण

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हयातील १० दिव्यांग मतिमंद मुलांचे कायदेशिर पालकत्व प्रमाणपत्राचे वितरण जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. नॅशनल ट्रस्ट फॉर वेलफेअर ऑफ परर्सन्स विथ ऑटीझम सेरेबल पाल्सी मेंटल रिटायर्डेशन ण्ड मल्टीपल डिसेंबीलीटी क्ट १९९९ च्या कायदयातील कलम १४ (४) मधील तरतुदी नुसार जिल्हा परिषद येथील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय येथे हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रशांत गायकवाड म्हणाले की, कायदेशीर पालकत्व प्रमाणपत्राचा उपयोग पालकांनी केंद्रशासन व राज्यशासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा लाभ दिव्यांग व्यक्तींना मिळवून देण्याबाबत व दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने पालकांनी प्रयत्न करावा. दिव्यांग पाल्याचे भवितव्य उज्वल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

यावेळी नंदकिशोर बळीराम शिवशरण, अनिल किसन कडलग, अश्पाक गफूरभाई शेख, संदीप एकनाथ देठे, मनिषा किशारे शिंदे, रेश्मा सोपान तारडे, शबनम शेख, शिवाजी गागरे, विदया नांगळ, तरन्नुम खान आदी दिव्यांग व्यक्तींच्या पालकांना कायदेशिर पालकत्व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

कायदेशीर पालकत्व देण्यामध्ये स्थानियस्तर समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे विशेष सहकार्य लाभले.पालक अनिल कडलग सरांनी जिल्हाधिकारी दिव्यांग सक्षमीकरण कक्षा अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. दिव्यांगाप्रती असलेली तळमळ प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून जाणवल्याचे सांगितले. या कार्यक्रमास सावली दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे, मुख्याध्यापक सचिन तरवडे, विजय बळीद, गिन्यानदेव जाधव, सुयोग निमसे, शिवानंद भांगरे आदींसह दिव्यांग मुलां-मुलींचे पालक उपस्थित होते.

# गुरूकडे ईश्वरभेट मागा : सेवानाथ महाराज

**माळवाडगाव** : ईश्वराची भेट करून देण्याचे काम गुरु करतात. गुरुला मागायचं तर ईश्वरभेट मागा. गुरु आत्मज्ञानाचा महासागर असून ज्ञानमार्गाकडे जाण्याचा मार्ग सुलभ करतात, असा उपदेश सेवानाथ महाराज यांनी गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त भाविकांना केला.

श्रीरामपूरच्या आर्ट ऑफ लिविंग परिवारावतीने हनुमान मंदिर येथे गुरुपूजा सत्संग व महाराजांचे प्रवचन आयोजित केले होते. यावेळी गुरूंचे पूजन करण्यात आले. महाआरतीनंतर झालेल्या प्रवचनात महाराज म्हणाले की, गुरु पौर्णिमा म्हणजे व्यासपौर्णिमा, व्यासांनी वेद समाजात मांडले. ज्ञानाचा भांडार दिला. आजची गुरुपौर्णिमा व्यासांचा वाढदिवस म्हणून साजरी केली जाते. गुरु म्हणजे ब्रह्मज्ञान, परम सुख, असा ज्ञानाचा महासागर गुरुकडेच आहे. ज्ञान गुरूंच्या अंतः करणातून भक्तांना मिळते.शिष्याला दिशादर्शक बनविण्याचे काम व परमानंद मिळण्याचा मार्ग गुरुकडेच आहे. अहंकार, माया, मोह, लोभ, दूर होत आत्मज्ञानाचा मार्ग मिळतो. गुरुचा आनंद हा नित्यआनंद असून अखंडित राहतो, असे ते म्हणाले.

रामदास महाराज शास्त्री यांनी श्री श्री रविशंकर यांचे १८० देशात चालू असलेल्या कार्याचे कौतुक केले. यावेळी अनुराधा आदिक, प्रशांत लोखंडे, योग प्रशिक्षक सुजाता शेडगे, रचना फासाटे, महेश पटारे, देवा चौधरी, शुभांगी करवीर, बॉबी बकाल, अर्चना भंडारी, कुणाल करंडे, भरत बाठीया, प्रियंका लोखंडे, चित्रा खटोड, प्रतिभा जेठवा, मनीषा फरगडे, गिरीजा शिंदे, रवींद्र महाराज मुठे, दर्शन शेडगे, रावसाहेब काळे आदींसह भाविक उपस्थित होते.

# कणीस कवितासंग्रह शेती संस्कृतीचा उत्कट आविष्कार : डॉ. उपाध्ये



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : टाकळीभान येथील शेतकरी कवी पोपटराव पटारे यांचा कणीस कवितासंग्रह म्हणजे शेती आणि शेतकरी जीवन जाणिवांचा उत्कट शब्दाविष्कार आहे, असे उदगार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी काढले.

टाकळीभान येथील साहित्य परिवाराचे संस्थापक अध्यक्ष कवी प्रा. पटारे यांच्या कणीस कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ॲड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठानचे अध्यक्ष टी.ई. शेळके होते. राहूल पटारे यांनी स्वागत, प्रास्ताविक करून पाहुण्यांचा परिचय करून दिला. पोपटराव पटारे, राहूल पटारे, हेमंत पटारे, पंकज पटारे, आदित्य पटारे, सुनीता पटारे, अंजली पटारे, संपदा पटारे यांनी पाहुण्यांचा सत्कार केला.

कवी पटारे म्हणाले की, माझी कविता ही माझ्या अंतरंगाची निर्मिती आहे. ती माझ्या गावाच्या, शेतीमातीच्या, शेतकरी सुख-दुःखातून, निसर्ग जाणिवेतून उगम पावली आहे. सुनीता पटारे, डॉ. उपाध्ये, डॉ. शिवाजी काळे, डॉ. रामकृष्ण जगताप, पत्रकार कुलथे आदींच्या सहकार्यातून प्रकाशात आली आहे. आसरा प्रकाशनतर्फे डॉ. शिवाजी काळे, सुखदेव सुकळे, प्रा. शिवाजीराव बारगळ, अमोल मोहिते पाटील, अनुया मोहिते पाटील, पत्रकार प्रकाश कुलथे, डॉ. रामकृष्ण जगताप, स्वामीराज कुलथे, शरदराव पवार, कवयित्री संगीता फासाटे/ कटारे, अश्विनी शिंदे आदीनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मंजाबापू थोरात, अविनाश लोखंडे, भाऊसाहेब पवार, सुधीर मगर, भाऊसाहेब बनकर, प्रा. बाळासाहेब लेलकर, अर्जुन राऊत, एकनाथ डांगे, भारत भवार, प्रा. विजय बोर्ड, राजेंद्र तुरकणे, मयूर पटारे, संभाजीराव पटारे, रोहिदास पटारे, किशोर पटारे, कवी, गीतकार बाबासाहेब पवार, कवी तुषार दाभाडे, दादासाहेब पटारे, उज्ज्वला जगताप, स्नेहलता कुलथे, श्रद्धा कुलथे, मंदाकिनी उपाध्ये, आरती उपाध्ये, मोहिनी काळे आदी उपस्थित होते,

# राज्यस्तरीय आर्टिकल प्रेझेंटेशन स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

अशोकनगर : अशोक कारखान्याचे अध्यक्ष भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील व अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्री मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली अशोक कॉलेज ऑफ बी फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी येवला येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय आर्टिकल प्रेझेंटेशन या स्पर्धेत यश मिळविले.

स्पर्धेत देशातून १०० हून जास्त महाविद्यालयांच्या विद्यार्थी सहभागी झाले होते. अशोक बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी चतुर्थ क्रमांक मिळविला. यानिमित्त प्राचार्य डॉ. विवेकानंद काशिद यांनी आर्टिकल प्रेझेंटेशनचे भविष्यात महत्व तसेच फार्मसीनंतर करिअरच्या संधीची माहिती दिली. आर्टिकल प्रेझेंटेशनमुळे अशोक फार्मसीच्या विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास व आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल, असे मत प्राचार्य प्रसाद कोते यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक भानुदास मुरकुटे, कारखान्याचे उपाध्यक्ष हिम्मतराव धुमाळ, संस्थेचे अध्यक्ष कोंडीराम उंडे, उपाध्यक्ष योगेश विटनोर, सचिव सोपानराव राऊत, सहसचिव विरेश गलांडे, सिद्धार्थ मुरकुटे, मंजुश्री मुरकुटे, संचालक निरज मुरकुटे, पॉलिटेक्निकचे प्राचार्य अंजाबापू शिंदे तसेच कारखान्याच्या सर्व संचालक मंडळ आदींनी अभिनंदन केले. स्पर्धेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य प्रसाद कोते, विभाग प्रमुख प्रा. किरण थोरात, शैक्षणिक समन्वयक प्रा. रविंद्र लाड यांचे मार्गदर्शन लाभले.


## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि. १५ जुलैं २०२५**

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

१२३ १५० ११४ — ६-0 — १४५ १९० ११८

जोड: ६४-३0-९८-५१-0२

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

१२६ ४६९ ३६0 — ९-५ — १४0 २३0 ७८0

जोड: ९७-१५-0२-३६-५८

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

१४६ ४४३ ११९ — १-२ — १५६ १२९ ११0

जोड: २३-१0-४५-७८-३२

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 14/04/2025 to 19/04/2025 | 257 40 389 | 270 96 268 | 169 62 570 | 169 62 570 | 489 15 168 | 359 76 240 |
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *


# एकत्रित प्रयत्नातून विविध योजनेत जिल्हा आघाडीवर : शालिनी विखे

**लोणी** : महायुती सरकारने सुरू केलेल्या लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत शिर्डी मतदारसंघ राज्यात अग्रस्थानी आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे समाजातील सर्व घटकांना योजनांचा लाभ मिळत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने शिर्डी मतदारसंघातील ३४१ लाभार्थ्यांना गृहसंच भांडे वितरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, लाभार्थी उपस्थित होते.

विखे म्हणाल्या की, केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनसेवा कार्यालयाचे समन्वयक हे करत असतात. यामुळे प्रत्यक्ष लाभ हा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे. मंत्री विखे आणि विखे कारखान्याचे अध्यक्ष




डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून स्वतंत्र यंत्रणाही सुरू आहे. यामुळे शिर्डी मतदारसंघात आणि अहिल्यानगरमध्ये सर्वात जास्त योजना सुरु आहे. महिलांसाठी विविध योजना आहेत. त्या महिलांनी समजून घेत पुढे जावे. जातीपातीचे राजकारण करण्यापेक्षा सर्वांना विविध योजनेबरोबरच आणि विकासकामाच्या माध्यमातून आधार देण्याचे काम विखे पाटील परिवाराच्या माध्यमातून केले जाते.

जन्मापासून तर मृत्यूपर्यंतच्या विविध योजना आहेत. या सर्व योजनेचा लाभ घेत असतानाच पालकांनी मुलांना चांगले संस्कार आणि चांगले शिक्षण द्यावे. त्याचबरोबर महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून व्यावसायिक दृष्टिकोन जपावा. यासाठी जनसेवा फौंडेशन आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे त्यांनी आश्वासित केले. प्रस्ताविक कैलास तांबे यांनी केले. यावेळी शिर्डी मतदारसंघातील प्रवरा परिसर, आश्वी परिसर आणि गणेश परिसरातील विविध गावातील ३४१ लाभार्थ्यांना गृह उपयोगी भांडे संच वितरण करण्यात आले.

**शिर्डी अव्वल स्थानावर** : शेतकरी, सर्वसामान्य जनता, ऊस तोडणी कामगार, नागरिकांसाठी अपघाती विमा, शिक्षणाच्या विविध सुविधा निर्माण करत असताना प्रत्येक योजनेचा प्रभावी अवलंब शिर्डी मतदारसंघांमध्ये होत आहे आणि म्हणूनच शिर्डी मतदारसंघ हा विविध योजना राबवण्यात राज्यात अव्वल स्थानावर राहिला आहे.

द • ख • ल

## घारगावच्या शिक्षण शास्त्र बी.एड. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील श्री दत्तकृपा शैक्षणिक कृषी ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगाव येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या बी.एड. अभ्यासक्रम परीक्षा एप्रिल २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.या परीक्षेत वराळे नीलम हिने ९० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, चोर श्रद्धा हिने ८८.७६ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर डोमाळे पूजा हिने ८४.५६ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.या सर्व विद्यार्थ्यांच्या यशस्वी निकालाबद्दल श्री दत्तकृपा शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष . दत्तात्रय पानसरे साहेब, सचिव. अर्चनाताई पानसरे, रजिस्टार श्री. कल्याण शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मच्छिंद्र गोंटे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय प्रगतीपथावर असून या निकालामध्ये सर्व मार्गदर्शक शिक्षक आदींचे विशेष योगदान लाभले.संपूर्ण महाविद्यालय परिवाराने यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## शेअर मार्केटच्या नावाखाली फसवणूक न्यायासाठी म्हस्के यांचे उपोषण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा, पारनेर तसेच राज्यातील विविध भागांत शेअर मार्केटच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.नवनाथ अवताडे हा संचालक असलेल्या सर्व कंपन्यांची तातडीने चौकशी व्हावी व सर्व मुख्य आरोपींना तातडीने अटक करावी. आरोपींनी गोळा केलेली गोरगरिबांची रक्कम कुठे आहे याची चौकशी करून ती रक्कम ताब्यात घेऊन गुंतवणूकदारांना परत देण्यात यावी. जिल्ह्यात या कंपन्यांसारख्या असंख्य कंपन्या आजही कार्यरत आहे व लोकांची फसवणूक करत आहेत त्यांची देखील चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी. एवढ्या दिवस या कंपनीच्या कोणाच्या आशीर्वादाने लोकांची फसवणूक करत होत्या याची देखील चौकशी व्हावी. या सर्व मागण्यांसाठी पंचायत




समितीचे माजी सदस्य राजेंद्र म्हस्के यांनी श्रीगोंदा तहसील कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू आहे.या उपोषण दरम्यान राजेंद्र म्हस्के सांगितले की,सिस्पे, इन्फनाईट बिकॉन यांसारख्या नवनाथ अवताडे संचालक असलेल्या सर्व कंपन्यांच्या माध्यमातून श्रीगोंदा तालुक्यात आणि परिसरात कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या कंपन्यांचे मुख्य सूत्रधार नवनाथ आवताडे व त्याचे इतर संचालक अगिस्ती मिश्रा,ययाती मिश्रा,शुभम अवताडे,गौरव सुखदेवे,राहुल काळाखे,प्रसाद कुलकर्णी, विनायक मराठे,सचिन खडतारे, ओंकार भुसारे,संदीप दरेकर व यांना तालुक्यातील सहकार्य करणारे संदिप रोडे, पांडुरंग खामकर,भरत खामकर, झुंझार इतर सहकारी यांनी जादा परताव्याचे आमिष दाखवून शेकडो गुंतवणूकदारांकडून पैसे गोळा केले. मात्र, कालांतराने कोणालाही ना परतावा मिळाला, ना मूळ रक्कम मिळाली.लोकांनी कर्ज काढून गुंतवणूक केली आहे.अवताडे व त्याच्या सहकाऱ्यांनी तालुक्यातील गोरगरीब लोकांना लुटले आहे परंतु प्रशासनाचे त्याच्याकडे लक्ष नाही. प्रशासनाने कोणतीही ठोक भूमिका घेतली नाही. गुंतवणूकदार आस लावून बसलेला आहे परंतु जर अशी परिस्थिती राहीली तर काहीच हाती लागणार नाही.या घोटाळ्यामुळे अनेक कुटुंब रस्त्यावर आल्याशिवाय राहणार नाहीत.आजपर्यंत मी सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर लढत आलेलो आहे. गोरगोरीब लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी ही लढाई शेवटपर्यंत लढणार आहे.या मागणीसाठी सोमवारी(,दि. १४ जुलै) रोजी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आंदोलन व उपोषण करण्यात आले .या उपोषणस्थळी राजकीय व सामाजिक पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.या उपोषणात फसवणूकग्रस्त गुंतवणूकदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये ३६ खेळाडूंचे यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नुकत्याच पुणे येरवडा येथे झालेल्या युथ वॉरियर कप निमंत्रित राज्यस्तरीय कराटे स्पेर्धेमधे अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या ३६ खेळाडूंनी सहभाग नोंदाविला असून स्पर्धेत सर्वच खेळाडूंनी अनेक पदकांची लयलूट केली. कराटे स्पेर्धेमधे कुमीते व काता या दोन प्रकारात प्राविण्य प्राप्त खेळाडू (मुली)- श्रुती भैस -सुवर्ण व रौप्य , सना शेख -२ रौप्य, जोया शेख - रौप्य, स्वामीनी सोनावणे - रौप्य, जिया पटेल - सुवर्ण व कांस्य, सान्वी साळुंके रौप्य व कांस्य, इरा साळुंके सुवर्ण व कांस्य, ग्रेसि वाघमारे-कांस्य, सांची शेणवी -२ रौप्य, हरिप्रिया भोरे- रौप्य, वैष्णवी कुटे -सुवर्ण, स्वरा कुरटे-सुवर्ण व रौप्य, खुशी कुरटे-रौप्य, आरोही अचारी-रौप्य, यशश्री बांगर- सुवर्ण पदक, (मुले)- अरमान शेख -कांस्य, नर्हे ओंकार- रौप्य, अथर्व जाधव-सुवर्ण, प्रणव दराडे-सुवर्ण व कांस्य, रुद्रप्रताप मुळे-कांस्य, रेहान पटेल-सुवर्ण, राजवीर सारवान-कांस्य, तैमूर सय्यद-सुवर्ण, रोहन दुशिंग -२ रौप्य, साई आचारी-रौप्य, आदेश चव्हाण-कांस्य व रौप्य, स्वराज लिमन-२ रौप्य , ऋषिकेश खेडकर सुवर्ण, मयंक पवार सुवर्ण व रौप्य, समर्थ सूर्यवंशी -सुवर्ण, आदित्य पुजारी-कांस्य, अविनाश गोल्हार-सुवर्ण व कांस्य, आरव टकले-२ कांस्य, प्रदीप होडग-कांस्य, मृत्युंजय शिंदे-कांस्य, नबील पटेल-रौप्य या खेळाडूंनी पदके मिळवून अहिल्यानगर शहराचे नाव सर्वत्र मोठे केले आहे.

# प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरीत विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भाळवणी :** भारतातील सार्वत्रिक निवडणूक ही आपल्या लोकशाहीचा आत्मा म्हणून ओळखली जाते. भारतीय संविधानामध्ये निवडणुकीला महत्त्वाचे स्थान दिले आहे. या आदर्श निवडणुकीचा अनुभव व लोकशाही प्रणालीची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून पारनेर तालुक्यातील प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी येथे वर्गमंत्रीमंडळ व शाळा प्रतिनिधी यांची निवड प्रत्यक्ष मतदान पद्धतीने पार पडली.

प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी येथे मागील नऊ वर्षांपासून पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांच्या वर्ग मंत्रिमंडळाच्या निवडी प्रत्यक्ष मतदानाच्या प्रक्रियेतून घेण्यात येतात. यामध्ये वर्ग प्रमुख, उपवर्ग प्रमुख, अभ्यास प्रमुख, क्रीडा प्रमुख, सांस्कृतिक प्रमुख, वाचनालय प्रमुख, आरोग्य प्रमुख अशी पदे निवडली जातात. चालू वर्षीच्या निवडणुकीची अधिसूचना मुख्याध्यापक संदीप महांडुळे यांच्या मार्गदर्शनात शिक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून लतीफ राजे यांनी सोमवारी काढली. त्यानंतर पाच रुपये अनामत रक्कम घेऊन विद्यार्थ्यांनी उमेदवारी अर्ज भरले. त्यावर सूचक तसेच अनुमोदक यांची नावे व सह्या सुद्धा घेण्यात येऊन गुरुवारी विद्यार्थ्यांना चिन्ह वाटप करण्यात आले. शुक्रवारी दुपारच्या सत्रात सर्वच वर्गांमध्ये एकाच वेळी मतपत्रिकांवर रबरी फुलीचा शिक्का मारून प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. विद्यार्थ्यांनी रांगा लावून मतदान प्रक्रिया पार पाडली. हजेरी पटाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सह्या घेऊन बोटाला शाई लावून मतदान घेण्यात आले.

### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**वर्ग मंत्रिमंडळाची निवड झाल्यानंतर निवडून आलेल्या सर्व वर्गमंत्रीमंडळातील विद्यार्थ्यांनी शनिवारी शाळा प्रतिनिधीसाठी एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी यांची निवड तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या मोबाईल ॲप मार्फत केली. या मोबाईल ॲप मार्फत विद्यार्थ्यांनी मतदान करून शाळेचे प्रतिनिधी निवडून दिले यामध्ये विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आयुष गायकवाड तर विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून संस्कृती कोळेकर यांची निवड झाली. सर्व विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षक व मुख्याध्यापक संदीप महांडुळे यांनी अभिनंदन केले.**

**आमच्या प्राथमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी वर्ग मंत्रिमंडळाच्या प्रतिनिधींची निवड प्रक्रिया शुक्रवार व शनिवारी पार पडली. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव घेऊन निवडणूक प्रक्रियेची माहिती मिळाली. प्रत्येक वर्गातून निवडून आलेल्या विविध प्रतिनिधींना त्यांच्या कामकाजाची माहिती देऊन त्यांना वर्गाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी यातून मिळाली आहे. तसेच या सर्व वर्ग मंत्री मंडळातील सदस्यांनी आपले शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधी निवडून दिले.**

**-संदीप महांडुळे**
**मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा ढवळपुरी**

**शालेय वर्ग मंत्रीमंडळाची निवडणूक प्रक्रियेसाठी प्रत्यक्ष मतपत्रिकेवर प्रत्येक पदांसाठी उभे राहिलेल्या विद्यार्थ्यांची नावे टाकण्यात आली तसेच त्यांना पेन, पुस्तक, कॉम्प्युटर, पॅड अशी चिन्हे देण्यात आली. खोडरबर पासून बनविलेल्या रबरीफुलीच्या शिक्याचा वापर करून विद्यार्थ्यांनी मतदान केले. तसेच विद्यार्थ्यांच्या मतदानाअगोदर सह्या घेऊन त्यांच्या बोटांना शाई लावण्यात आली. याप्रसंगी सर्व वर्गशिक्षकांनी केंद्रप्रमुखाची भूमिका पार पाडली. अशा प्रकारे विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष निवडणूक या अध्यापनाची प्रक्रिया यातून पार पडली.**

**-लतीफ राजे**
**शिक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी**

### अटीतटीच्या लढती

**मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर केंद्रप्रमुख म्हणून कामकाज पाहणारे सर्व वर्गशिक्षक यांनी आपापल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या समोर प्रत्यक्ष वर्गात मतमोजणी केली. यावेळी मतमोजणी होत असताना विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह व उत्कंठा दिसून आली. काही वर्गांमध्ये खूपच अटीतटीच्या लढती झाल्या तर दोन वर्गात समसमान मते पडल्याने चिठ्ठी टाकून पहिलीच्या विद्यार्थ्यांनी चिठ्ठी उचलून विजयी विद्यार्थी घोषित करण्यात आले.**

# एम.आय.डी.सी.व शेतीच्या पाण्यासाठी एकत्रित लढा दिला पाहिजे: राम पोटफोडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** वरुर-आखेगावसह १३ गावांना शेतीसाठी पाणी व शेवगाव तालुक्यात एम.आय.डी.सी. फक्त आणि फक्त ॲड.शिवाजीराव काकडे व हर्षदा काकडे यांच्याच प्रयत्नातून येऊ शकते. त्यांनी मंजूर करून आणलेल्या ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र.०२ योजनेतून अद्यापही २० गावांच्या लोकांना 'हे' प्रस्थापित अकार्यक्षम सत्ताधारी पाणी देऊ शकलेले नाहीत, त्यामुळे आपण पक्षाचे जोडे बाजूला ठेवून एकत्रित लढा दिला पाहिजे असे प्रतिपादन जनशक्तीचे कार्याध्यक्ष राम पोटफोडे यांनी केले. सोमवार दि.(१४) रोजी आखेगाव येथे जनशक्ती विकास आघाडीच्या नूतन शाखेचा उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्तात्रय झिंजुर्के हे होते तर लक्ष्मण गवळी, भारत भालेराव, रामनाथ भालेराव, राजेंद्र फलके, सखाराम घावटे, भगवान गोर्डे, सतीश काटे, त्र्यंबक काटे, ज्ञानेश्वर सातपुते, आसाराम काटे, म्हातारदेव काटे, अशोक कोल्हे, अशोक गवळी, जगन्नाथ पाबळे, शरद पायघन, सचिन बोरुडे, दाविद खर्चन, बाळासाहेब नजन, बंडू नजन, भगवान ढोबळे, किसन कोल्हे, अण्णा फुलमाळी, गणेश काटे, बंडू धावणे, नवनाथ काटे, सावळेराम पायघन आदि प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी शाखेच्या अध्यक्षपदी एकनाथ काटे, उपाध्यक्ष श्रीरंग हूलजुते, कार्याध्यक्ष अनिल जाधव तर सचिव म्हणून भगवान काटे यांची यावेळी निवड करण्यात आली.

यावेळी पोटफोडे म्हणाले की, आत्तापर्यंत प्रस्थापितांनी आलटून पालटून तीस _तीस वर्षे सत्ता भोगल्या आहेत. तरीही यांना पैठण धरणातील आरक्षित पाणी सुद्धा शेवगाव तालुक्यातील जिरायत भागांना देता आले नाही. आमचे नेते ॲड.शिवाजीराव काकडे यांनी अथक संघर्ष करून ताजनापूर टप्पा क्र. ०२ व वरूर आखेगाव सह १३ गाव योजना मंजूर करून घेतली. तालुक्यातील जिरायत भागातील शेतीला पाणी मिळावे यासाठीहर्षदा काकडे यांनी विधानसभा लढवली. परंतु त्यात अपयश आले. आता या प्रस्थापितांनी या मंजूर योजना लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. म्हणून आपण गावागावात चळवळ उभा करत आहोत. आपल्या विविध प्रश्नांची सोडवणूक या एकीतूनच होऊ शकते. म्हणून या संघटनेमध्ये सर्वांनी समाविष्ट व्हावे तरच हे प्रश्न आपण सोडवू शकतो.

कार्यक्रमाचे अध्यक्ष झिंजुर्के म्हणाले, काकडे दांपत्य सात्विक विचारायचे आहे. त्यांची गोरगरिबांसाठीची तळमळ आपण पाहत आहोत. हाती कोणतीही मोठी सत्ता नसताना त्यांनी तालुक्यात पाणी योजना मंजूर केल्या. त्या फक्त संघर्ष करूनच. म्हणून आपण इथून पुढे तरी विचार करा व चांगल्या माणसांना पाठबळ द्या असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊसाहेब सातपुते यांनी तर आभार श्रीरंग हुलजुते यांनी मानले. यावेळी कार्यक्रमास तरुणांची उपस्थिती लक्षवेधी होती.

## भैरवनाथबन येथे रस्त्याच्याकडेला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला

**श्रीरामपूर:** पुणतांबा - खैरी रस्त्यावरील भैरवनाथ परिसरातील भैरवनाथबन येथे रस्त्याच्याकडेला असलेल्या खोल खड्ड्यात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत रविवारी सहा वाजेच्या दरम्यान आढळून आल्याने खळबळ उडाली.रस्त्याच्या कडेला आतील बाजूस झाडाझुडूपामध्ये मृतदेह आढळून आला. यावेळी घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.सदर घटनेची माहिती पोलीसांना समजताच श्रीरामपूर शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदर व्यक्तीने अंगावर काळ्या रंगाचा हाफ टी-शर्ट आणि ग्रे रंगाची नाईट पॅन्ट घातलेली असून चेहर्याची अतिशय वाईट अवस्था असल्याने ओळख पटली नाही. जागेवरच मृतदेहाचा पंचनामा करून अंत्यविधी करण्यात आला. पोलीसांकडून तांत्रिक माहितीच्या आधारे मृतदेहाची ओळख पटण्याचे काम सुरु आहे. नेमके हा घातपात आहे का, अन्य काही यांचा शोध पोलीस घेत आहेत.

# वृक्षारोपणामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा : टेमकर

## राजमाता विद्यालयात वृक्षारोपण

**करंजी :** ऑक्सिजनचे महत्त्व कोरोनामुळे का होईना सुशिक्षितासह सर्वसामान्य माणसाला समजले आहे. त्यामुळे वृक्षतोड थांबवून वृक्ष लागवड व्हायला हवी व त्यामध्ये तरुणांचा व विद्यार्थाचा सहभाग मोठ्या प्रमाणात असायला हवा असे प्रतिपादन एमसीएस ग्रुपचे उद्धवराज टेमकर यांनी केले.

राजमाता प्राथमिक व माध्य . महाविद्यालय मराठवाडी ता. आष्टी या ठिकाणी बीसीएस एमसीएस ग्रुपच्या माध्यमातून वड, पिंपळ अशा १२० झाडांचे वृक्षा रोपन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य शिवाजी दानवे हे होते तर राजमाता शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक आकाश तरटे, सामाजिक कार्यकर्ते परशुराम मराठे हे होते.



नगरी फॉर नेचर हे घोषवाक्य घेऊन बीसीएस व एमसीएस २००३ व २००९ या ग्रुपने आज पर्यंत जवळपास सातशे गावातील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, व शाळा महाविद्यालयतील प्रांगणामध्ये हजारो वृक्षारोपण केले आहे . झाडे लावा,झाडे जगवा हीच काळाची गरज आहे. वाढते तापमान, पाणी टंचाई, वायुप्रदूषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वृक्ष लागवड हा प्रभावी उपाय असल्याचे संचालक आकाश तरटे यांनी सांगितले.

यावेळी विशाल पंचारिया, शुभांगी जोशी, विद्या गुंड, धर्मराज गुंड, महेश शिंदे, प्रिया उंबरहांडे, सुप्रिया टेमकर, मेजर नंदकुमार अकोलकर, आदि उपस्थितीत होते.

# केंद्राच्या स्वच्छता कमिटीची श्रीगोंद्यात अचानक भेट; ग्रामपंचायतीची उडाली तारांबळ




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा ;-** केंद्राची स्वच्छता कमिटी अचानक श्रीगोंद्यात आली आणि तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीची मोठ्या प्रमाणात तारांबळ उडाल्याचे चित्र पाहण्यास मिळाले असून मोठ्या प्रमाणात झाडाझडती आणि त्रुटी यामुळे चांगलाच कामकाजाचा बोजवारा समोर आल्याने कमिटी नेमकी काय अहवाल देणार याकडे अनेक ग्रामपंचायतीचे लक्ष लागून राहीले आहे. केंद्राच्या स्वच्छता समितीमध्ये विविध सरकारी विभागांचे प्रतिनिधी आणि तज्ञ लोक असतात. या समितीचे मुख्य काम म्हणजे स्वच्छ भारत अभियान सारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छता योजनांची अंमलबजावणी करणे आणि त्यांचे निरीक्षण करणे. हे मुख्य काम असून यांच्या मार्फत स्वच्छता सर्व्हेक्षण करण्यात येऊन त्याचा अहवाल सादर केला जातो, यामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या स्वच्छतेशी संबंधित योजनांची अंमलबजावणी करने ,स्वच्छता योजनांसाठी आवश्यक असलेले नियोजन करणे आणि त्यांची योग्य व्यवस्था करणे. स्वच्छता योजनांसाठी आवश्यक असलेल्या निधीचे योग्य वाटप आणि व्यवस्थापन करणे. स्वच्छ भारत अभियान आणि इतर स्वच्छता योजनांच्या प्रगतीचा अहवाल केंद्र सरकारला सादर करणे.राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संबंधित घटकांना स्वच्छता कार्यात मार्गदर्शन करणे आणि समन्वय साधणे. स्वच्छतेचे महत्व लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती करणे. अशी अनेक कामे आहेत हि कमिटी कोणतीही कल्पना न देता अचानक कुठेही जाऊन सखोल चौकशी करू सरकारला अहवाल सादर करते मग त्यानुसार पुढील कारवाया होतात आपल्याकडे आलेय या कमिटीचे अध्यक्ष अक्षय महाजन (एसएसजीअसेंसॉर) यांनी श्रीगोंद्यात अचानक भेट घेत तालुक्यातील चार ग्रामपंचायतीला भेटी दिल्या आहेत ,त्यामध्ये आढळगाव, देवदैठण,बेलवंडी येळपणे या ग्रामपंचायतीला भेट देऊन ग्रामपंचायतीच्या विविध कामाची पाहणी केली असून शाळा अंगणवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ग्रामपंचायत परिसर स्वच्छतेबाबत पाहणी व माहिती घेतली असून त्यांनी या गावातील सरासरी १६ कुटूंबाना भेटी देत शौचालय तसेच ग्रामपंचातीकडून स्वच्छतेबाबत मिळणाऱ्या सुविधा आहेत का याची खातरजमा केली आहे. तसेच घनकचरा सांडपाणी याचे असेट पाहणी करून चालू आहे कि नाही याबाबत खात्री केली आहे या सर्व गोष्टीचा अहवाल सरकारी ऍपच्या माध्यमातून केंद्राला तसेच त्याची माहितीस्तव एक प्रत राज्य सरकारला जाणार असल्याची माहिती मिळाली आहे या चौकशी मध्ये आढळगाव ग्रामपंचातीच्या त्रुटी मध्ये शाळेचे ड्रेनेज लाईन पॉईंट आढळला नसल्यामुळे याबाबत अहवाल लवकरच केंद्र राज्य सरकारला जाणार असौन त्याचेवर कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही या कमिटीमध्ये कमिटीचे अध्यक्ष अक्षय महाजन (एसएसजीअसेंसॉर) यांच्यासोबत पंचायत समिती मधून हरीश कुरे,ग्रामपंचायत अधिकारी पदाधिकारी ,शिक्षक अधिकारी, अंगणवाडी सेविका यांच्यासह आदी कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने हजर होता कमिटी नेमका काय अहवाल देणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे .

# संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा जामखेडमध्ये निषेध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या हल्ल्याचा जामखेड येथे मराठा-बहुजन समाजाच्या संघटनांसह विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी जामखेडचे तहसीलदार यांना निवेदन देत जाहीर निषेध केला. निवेदन देतावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त करताना म्हणाले की, संभाजी ब्रिगेड संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट या ठिकाणी शाईफेकीची घटना घडली.सदर ठिकाणी प्रवीण गायकवाड यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वाजत गाजत ते कार्यक्रमस्थळी जात होते. या दरम्यान त्यांच्यावर शिवधर्म प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी शाईफेकीचा हल्ला केला. विशेष म्हणजे यावेळी त्यांना धक्काबुक्की देखील करण्याचा प्रयत्न झाला. प्रविण गायकवाड हे गेल्या ३० वर्षापासून मराठा बहुजन समाजासाठी कार्यरत आहेत. तरुणांनी उद्योग व्यवसाय करुन आर्थिक सक्षम व्हावे यासाठी अहद ऑस्ट्रेलिया तहद कॅनडा या अभियानातुन ते सतत प्रयत्नशील आहेत. प्रविण गायकवाड यांनी जे कार्य उभे केलेले आहे, ते क्रांतीचं



वादळ आहे. या वादळात हजारो तरुणांना शिक्षण उद्योजकता, आत्मभान आणि सामाजिक सन्मान लाभले आहेत. आजही ते मराठा-बहुजन समाजासाठी कार्यरत आहेत. दंगलीसाठी दगड उचलणाऱ्या हजारो हातामध्ये लेखणी व डोक्यात शिवरायांचे शिवविचार घालण्याचे काम प्रविण गायकवाड यांनी केले आहे. प्रविण गायकवाड हे संविधान वादी विचाराचे नेते आहेत. ते ज्या संघटनेचे नेतृत्व करतात ती संभाजी ब्रिगेड महापुरुषांच्या सन्मानार्थ आणि मराठा आरक्षण लढ्यात कायम आघाडीवर राहिली आहे.हल्लेखोर हे गुंड प्रवृत्तीचे आहेत. त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे.त्यांना कठोर शासन करावे. तसेच या हल्ल्यामागे असलेल्या राजकीय शक्तींचा पर्दाफाश करुन भविष्यात अशा हल्ल्यांना आळा बसण्यासाठी ठोस कारवाई व्हावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी उपस्थित मराठा समन्वयक अवधूत पवार, वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव, नगराध्यक्ष विकास राळेभात, नगराध्यक्ष निखिल घायतडक, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत राळेभात, प्रकाश काळे, संभाजी ब्रिगेडचे ता.अध्यक्ष कुंडल राळेभात, सुनील जगताप, प्रा.विकी घायतडक, विनायक राऊत, प्रहार जनशक्तीचे जयसिंग उगले, प्रहार चे ता.अध्यक्ष नय्युम सुभेदार, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष आतिश पारवे, ॲड. हर्षल डोके, ॲड. बाळासाहेब घोडेस्वार, शहराध्यक्ष वसीम सय्यद, नगरसेवक अर्षद शेख, भिमटोला संघटनेचे अध्यक्ष बापूसाहेब गायकवाड, पारनेर बँकेचे संचालक दत्तात्रय सोले , राजन मेघडंबर, अशोक पठाडे, अशोक घुमरे, डॉ. चंद्रशेखर नरसाळे, हरिभाऊ आजबे, सरपंच सागर कोल्हे, गणेश म्हस्के, किरण पवार, प्रशांत वारे, भाऊसाहेब शिंदे, प्रा. शहाजी डोके सर, पोपट लोखंडे, शिवा लोखंडे, काकासाहेब कोल्हे, ज्ञानदेव ढवळे, दत्तात्रय डिसले आदी मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

# शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी गोरे, उपाध्यक्षपदी दारुणकर



अध्यक्ष पदी अभय गोरे उपाध्यक्ष कोमलताई दारुणकर यांचा सत्कार करताना.(छाया- कृष्णा मडके)

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चापडगाव** - शेवगाव तालुक्यातील चापडगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद शाळेसाठी शालेय शिक्षण समितीची निवड नुकतीच पार पडली.

या निवडीत अध्यक्षपदी अभय गोरे तर उपाध्यक्ष पदी कोमलताई रामेश्वर दारुणकर यांची निवड करण्यात आली.

सदस्य पदी विठ्ठल गमे,अमृता लोहकरे, विठ्ठल भिसे, गणेश मडके, अंकुश गोरे,सविता नाईक,सीता निर्मळ,पूजा नेमाने,कल्पना गोरे,उज्वला पातकळ,स्वाती गोरे, गवाजी बळीद, तुकाराम भगत यांची निवड करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष कल्याण नेमाने, सुभाष लोहोकरे,सुरेश नेमाने,अण्णासाहेब गोरे,भारत नेमाने,बाळासाहेब पातकळ,गमे , निलेश गायकवाड,सतीश गोरे ,भगत व शिक्षक उपस्थित होते.

# कंटेनरखाली चिरडून मनुष्यबळ विकास अधिकाऱ्याचा मृत्यू

पुणे : तळेगाव - चाकण महामार्गावरील खालुंब्रे ता.खेड ) गावच्या हद्दीतून दुचाकीवरून कंपनीत कामावर जाणाऱ्या मनुष्यबळ विकास अधिकाऱ्याचा अवजड कंटेनरच्या खाली सापडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना (दि.१४) सकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास घडली. गजानन बाबुराव बोळकेकर (वय.२६ वर्षे,रा. बोलका,ता. कंधार,जि.नांदेड) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या युवकाचे नाव आहे.विजय शंकरराव तंतरपाळे ( वय.२४ वर्षे,रा. चाकण ) यांनी म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून मोहम्मद अरमान कमरुददीन खान (वय,३० वर्षे,सध्या रा.धारावी मुंबई,मुळ रा.पूरेबक्श छताईडीह पोस्ट राणीजोत ता.तुलसीपुर,जि.बलरामपूर ) या कंटेनर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदित्य गायकवाड (वय.२३ वर्षे,सध्य रा.येलवाडी,मुळ रा.साऊर, ता.भातकुली, जि.अमरावती ) आणि गजानन बोळकेकर हे



दुचाकी वरून सकाळी ( दि.१४ ) ला सकाळी पावणे सात खालुंबे गावच्या हद्दीतील हुंडाई चौकाजवळ कंपनीत कामावर जात होते. मोहम्मद खान हा आपल्या ताब्यातील कंटेनर मुंबईकडून चाकण बाजूकडे भरधाव वेगात घेऊन जात होता. रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन ओव्हरटेक करताना दुचाकीस धडक दिली. यामुळे दुचाकी घसरून पडल्याने दुचाकीच्या मागे बसलेले गजानन हे कंटेनरचे पाठीमागील चाक आल्याने त्याचा चेंदामेंदा होऊन जागीच मृत्यू झाला आहे. तर दुचाकीचालक आदित्य गायकवाड हे जखमी झाले आहेत. तळेगाव - चाकण हा मार्गावर अरुंद रस्ता, सततची वाहतूक कोंडी आणि मार्गावर पडलेल्या बेसुमार खड्ड्यातून प्रवास करणे लोकांच्या जीवावर बेतत आहे. आजचा बळी हा त्यामधील एक आहे. गजानन यांना कामावर जाण्यासाठी उशीर झाल्याने त्यांनी आदित्य यांच्याकडे लिफ्ट मागवून ते कंपनीत जात होते. परंतु ते कंपनीत पोहचलेच नाही कारण दुर्दैवाने त्यांचा अपघातात बळी गेला. अपघात इतका भीषण होता की गजाजन हे कंटेनरच्या चाकाखाली आल्याने अक्षरशः त्यांचा शरीराचा चेंदामेंदा झाला होता.

**३ महिन्यापूर्वी झाले होते लग्न**

गजानन बोळकेकर चाकण एमआयडीसीच्या पानसे ऑटो कॉम युनिट या कंपनीमध्ये एचआर म्हणून कार्यरत होते. अपघाताच्या दिवशी कंपनीत जायला उशीर झाल्याने त्यांनी लिफ्ट मागितली होती. परंतु काळाचा घाला झाला अन् ट्रेलरखाली सापडून त्यांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार ३ महिन्यापूर्वीच गजानन यांचे लग्न झाले होते. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# सरसकट जमीन मोजणीचे राजव्यापी अभियान राबविण्याचा निर्णय: आ. गर्जे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी:**राज्यात शेतीच्या बांधांवरील आणि रस्त्यांवरील सुरू असलेल्या वादांना कायमचा पूर्णविराम देण्यासाठी राज्य शासनाने आधुनिक पद्धतीने सरसकट जमीन मोजणीचे राजव्यापी अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. विधान परिषदेच्या सभागृहात आमदार शिवाजीराव गर्जे यांनी ही मागणी लावून धरली होती त्यावर उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वाचे निर्णय जाहीर केले. सभागृहात बोलताना आमदार गर्जे म्हणाले, ''पूर्वी 'पाणी आडवा, पाणी जिरवा' ही घोषणा होती, मात्र आता 'रस्ते आडवा, एकमेकांची जिरवा' अशी ग्रामीण भागातील स्थिती आहे. मोजणीतील अचूकता नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सतत वाद निर्माण होत आहेत. इंग्रजांच्या काळातील मोजणीच आजही आधारभूत आहे .त्यानंतर योग्य मोजणी न झाल्याने योग्य नोंदी नाहीत .बांधांच्या व रस्त्यांच्याखाना खुणा हद्दी निश्चित नाहीत .गावठाण सभोवतालचा ३० फूटांचा परंपरागत शिव रस्ता अतिक्रमणामुळे नष्ट



झाले आहेत. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सरसकट मोजणी करून अतिक्रमण हटवणे व रस्ते खुले करणे गरजेचे असल्याचे गर्जे यांनी स्पष्ट केले. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, ''राज्य सरकारने मोजणीसाठी १२०० ड्रोन व रोव्हर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड स्कॅनिंग प्रकल्पाच्या ७०% कामाची पूर्तता झाली असून, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत संपूर्ण गावठाण स्कॅनिंग पूर्ण केले जाईल.'' त्यांनी पुढे स्पष्ट केले की, ''पुढील काळात 'आधी मोजणी – नंतर रजिस्ट्री' धोरण लागू केले जाणार आहे. शिव रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात येणार आहे. यापुढे कमीत कमी१२ फूट रूंदीचे रस्ते असतील आणि त्यांच्या नोंदी सातबाऱ्यावर घेण्यात येणार आहेत. गावांच्या बाहेरच्या अतिक्रमणावरही कठोर पावले उचलली जातील.'' शेती मोजणीसाठी शुल्कात लक्षणीय कपात करून आता केवळ २०० रुपये प्रति हिस्सा शुल्क आकारले जाणार आहे. याआधी हेच शुल्क १००० ते ४००० रुपये होते. तसेच पोटहिस्स्याच्या रजिस्ट्रीसाठी फक्त ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर नोंदणी होणार आहे. महसूलमंत्र्यांनी सांगितले की, ''राज्यातील जमिनीचे अचूक सीमांकन होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. इतर राज्यांनी राबवलेल्या अशा मोहिमांचा अभ्यास करून त्यातील त्रुटी दूर करून महाराष्ट्रात अधिक परिणामकारक पद्धतीने मोहीम राबविली जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, दीर्घकाळ सुरू असलेल्या जमीनविवादांवर कायमचा तोडगा निघणार असल्याचे स्पष्ट दिसून येते.

# उणी जातीच्या अळीचा सोयाबीन पिकावर घाला

## रोगराईमुळे पेरलेले सोयाबीन पीक आले धोक्यात, शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान, भरपाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** ओतूर आणि परिसरात यंदा वेळेत आणि समाधानकारक पाऊस झाल्याने सर्वच शेतकऱ्यांनी पेरणीची कामे मार्गी लावली आहेत. प्रामुख्याने सोयाबीन पीक हे उत्तर पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. ओतूर, खामुंडी, उदापूर, डिंगोरे, रोहकडी, आंबेगव्हाण, पिंपरी पेंढार, हिवरे, धोलवड, ओझर, ठिकेकरवाडी, उंब्रज व इतर सर्व गावचे शेतकरी दरवर्षी प्रामुख्याने सोयाबीन पिकाचे उत्पादन घेत असतात. त्यानुसार सोयाबीनची पेरणी करण्यात येऊन ते शेतात उतरूनही आले आहे मात्र बहुतांश ठिकाणी या पिकाला रोगांचे ग्रहण लागले आहे.

उणी जातीच्या अळईने हे कोवळे उतरून आलेले सोयाबीन पीक फस्त केल्यामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्याने या भागातील शेतकरी पुरता हतबल झाला आहे.

खामुंडी (ता. जुन्नर) येथील शेतकरी रामभाऊ भोर, पोपट शिंगोटे आणि खामुंडी परिसरातील इतर शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकामध्ये उणी अळईने सोयाबीन पिकावर ताव मारल्याने उभे पिक नष्ट होऊ लागले आहे, परिणामी सदर सोयाबीन पिकाचा तातडीने पंचनामा करून नुकसान भरपाई मिळण्याची मागणी संबंधित शेतकऱ्यांनी केली आहे.

दरम्यान पेरणीनंतर उतरून आलेल्या पिकावर नैसर्गिकरीत्या घाला घालणाऱ्या व प्रचंड आर्थिक नुकसान सोसावा लागणारा शेतकरी हे सूत्र कुठेही जुळून येत नाही, ही अळी अत्यंत घातक असून ती सर्वत्र पसरण्याची व नुकसान करण्याची परिसरात भीती निर्माण झाली आहे. या अळीला आटोक्यात आणण्याचे प्रयत्न शेतकऱ्यांनी सुरू केले असले तरी अनेक एकर पेरलेले क्षेत्र या घातक अळी मुळे अक्षरशः रिकामे झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे सर्व बी बियाणे व अंगमेहनत आणि वेळ वाया जाऊन आर्थिक नुकसानीचा फटका बसणार आहे शासनाने अशा सर्व शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाचा तातडीने पंचनामा करून त्यांना आर्थिक भरपाई त्वरेने अदा करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



# कृषीदिनानिमित्त पणदरे येथे कृषिदूतांकडून वृक्षारोपण



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर -** ॲग्रीकलचरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलीत कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय शारदानगरचे चतुर्थ वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमासाठी पणदरे येथे वास्तव्य करत आहेत.

पणदरे येथे कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. कृषीप्रधान देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारत देशात कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून एक जुलै कृषीदिनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कृषी दिवस हा नैसर्गिकरित्याच पेरणीच्या मुहूर्तावर आलेला एक पावनपर्व आहे. महानायक वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणली. याशिवाय पंचायतराज व रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार मानले जातात. ते पहिले शेतकरी मुख्यमंत्री होते असे यावेळी कृषीदूतांनी सांगितले. यावेळी पणदरे गावचे सरपंच अजय सोनवणे,उपसरपंच,सदस्य, जि.प.शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक त्याचबरोबर शेतकऱ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कृषीदूत रिद्धीश पाटील,अनिकेत लकडे,वेद चौधरी,हर्षद गरुड,अमित नवले,तेजस शितोळे,अनुराग क्षीरसागर,शिवम जगताप,सुधांशु कुमावत आणि मुकुंद शेजवळ आदींनी वृक्षरोपण करीत गावाकऱ्यांना पर्यवरणाचे महत्व पटवून दिले.

# जामखेड तालुक्यातील गट -गण प्रारूप प्रभाग रचना जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड:** तालुक्यातील तीन जिल्हा परिषद गट व सहा पंचायत समिती गणासाठी आज प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. याबाबत जर कोणाची हरकत असेल तर सात दिवसांत दि. २१ पुर्वी जिल्हाधिकारी यांच्या कडे लेखी स्वरूपात कराव्यात असे आदेशात म्हटले आहे.जामखेड मधील ३ गट आणि ६ गण खालीप्रमाणे आहेत.गटाचे नाव ७३ साकत गणाचे नाव १४५ शिऊर या गणामध्ये मोहा, सावरगाव, राजुरी, डोळेवाडी, शिऊर, घोडेगाव, झिक्री, धोंडपारगाव, सारोळा, काटेवाडी, पाडळी खुरदैठण अशा दहा ग्रामपंचायत तर १२ गावे समाविष्ट आहेत.गणाचे नाव १४६ साकत साकत,कोल्हेवाडी, पिंपळवाडी, देवदैठण, नाहुली,नायगाव, जायभायवाडी, बांधखडक, तेलंगशी, आनंदवाडी, पिंपळगाव आळवा, धामणगाव असे एकूण दहा ग्रामपंचायत तर १२ गावांचा समावेश आहे. जिल्हा परिषद गटाचे नाव ७४ खर्डा गणाचे नाव १४७ खर्डा यामध्ये खर्डा, नागोबाची वाडी, मुंगेवाडी, पांढरेवाडी, दरडवाडी, दिघोळ, माळेवाडी, मोहरी, जातेगाव, लोणी बाळगव्हाण अशा सहा ग्रामपंचायत तर ११ गावाचा समावेश आहे. गणाचे नाव १४८ नान्नज नान्नज, आपटी, वाकी, सातेफळ, पिंपळगाव उंडा, तरडगाव, वंजारवाडी, दौंडाचीवाडी, सोनेगाव, जवळके, धनेगाव, राजे वाडी, गुरेवाडी, महारूळी, पोतेवाडी, वाघा अशा तेरा ग्रामपंचायत तर १६ गावे समाविष्ट आहेत. ७५ जवळा जिल्हा परिषद गट१४९ अरणगाव गणात डोणगाव, अरणगाव, पारेवाडी, फक्राबाद, पाटोदा, खामगाव, भवरवाडी, धानोरा, वंजारवाडी, रत्नापूर, सांगवी, कुसडगाव, सदरवाडी, खांडवी, डिसलेवाडी अशा आठ ग्रामपंचायत तर १४ गावे समाविष्ट आहेत.१५० जवळा गणात मुंजेवाडी, चोभेवाडी, बोर्ले, चौंडी, आघी, मतेवाडी, जवळा, कवडगाव, गिरवली, पिंपरखेड, हसनाबाद, बावी, हाळगाव अशा ११ ग्रामपंचायत तर १३ गावे समाविष्ट आहेत. अशा प्रकारे तीन जिल्हा परिषद गट व सहा पंचायत समिती गणासाठी आज प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. याबाबत जर कोणाची हरकत असेल तर सात दिवसांत दि. २१ पुर्वी जिल्हाधिकारी यांच्या कडे लेखी स्वरूपात कराव्यात असे

# पाथर्डी तालुक्यात खासगी सावकारकीचे प्रमाण वाढले; मनसेचे पोलिसांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मिरी :** पाथर्डी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सावकारीचा व्यवसाय जोमात सुरू आहे. यामध्ये गरीब शेतकरी, शेतमजूर, छोटे-मोठे व्यावसायिक या सावकारांच्या जाळ्यात अडकले आहेत. बेकायदा सावकारकीला लगाम घालण्याची मागणी पाथर्डी तालुका मनसेचे विद्यार्थी सेनेचे उपाध्यक्ष भागवत रोमन, मनसे तालुका उपाध्यक्ष समर्थ मांजरे यांनी पाथर्डी पोलीस स्टेशन निवेदन देऊन केली आहे. पाथर्डी तालुक्यात गरीब शेतकरी, शेतमजूर, छोटे - मोठे व्यावसायिकांना अडचणीच्यावेळी सावकारांच्या दारात जावे लागते. याचा फायदा घेत पाच टक्क्यांपासून २० ते २५ टक्क्यांपर्यंत व्याज आकारणी केली जाते. भरमसाठ व्याजाची रक्कम होत असल्याने कर्जदार व्याज व मुद्दल भरू शकत नाही. जबरदस्तीने कर्जदारांची जमीन, घर नावावार करून घेत आहेत. काही सावकार इतरांना



कमिशनवर सावकारकीसाठी पैसे पुरवितात. सावकारांच्या दहशतीमुळे त्यांच्याविरोधात पोलिसात तक्रार करण्यासाठी कोणी पुढे येत नाहीत. पोलिसही लेखी तक्रार असल्याशिवाय कारवाई करीत नाहीत. त्यामुळे सावकारांना आवर कोण घालणार? असा प्रश्न भागवत रोमन यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला.

परवाना नावालाच तालुक्यातील काही सावकारांकडे नावालाच परवाना आहे. ज्वेलरी व्यावसायिकांकडेही परवाना आहे. बँकाच्या व्याजानुसार सावकारांनी व्याज आकारणी करावी, असा नियम आहे. मात्र हे सावकार कमीत-कमी मासिक दोन ते तीन टक्के दराने व्याजाची आकारणी करीत आहेत. अशा सावकारांना संरक्षण देण्याचे काम होत असल्याचा आरोप ग्रामस्थांतून केला जात आहे. त्यामुळे अधिकार्यांनी या सावकारांवर कायदेशीर वचक बसवावी, अशी मागणी सर्व सामान्य वर्गातून होत आहे.

## द•ख•ल

# वळसे पाटील यांच्या हस्ते लोणीत विविध विकास कामांचे उद्घाटन संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** लोणी ( ता. आंबेगाव) येथे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या उपस्थितीत लोणी येथे विविध विकास कामांचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. यावेळी लोणी येथील शाळेतील नवीन खोलीचे उद्घाटन करण्यात आले. शाळा अंतर्गत कॉक्रीट रस्ता, सांस्कृतिक भवन,



मैदान समतल करणे व सुशोभीकरण, पालक प्रतीक्षा कक्ष, शाळा संरक्षक भिंत, हँड वॉश स्टेशन, सोलर सिस्टीम, रेन वॉटर हार्वेस्टिंग, विज्ञान कक्ष आदी नवीन होणा-या कामांचा भूमीपूजन करण्यात आले.भीमाशंकर सहकारी साखर कारखाना निधीमधून भैरवनाथ विद्याधाम या शाळेला ९ लाख रुपये किंमतीचे बैंच लोकार्पण करण्यात आले. यावेळी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे पाटील, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, महाराष्ट्र राज्याचे महसूल विभागाचे सहसचिव कैलास गायकवाड भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रदीप वळसे पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती निलेश थोरात, खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज मा.पंचायत समिती सदस्य रवींद्र करंजखेले, शरद बँक संचालक अशोक आदक, लोणी गावचे सरपंच सावळेराम नाईक, माजी सरपंच उद्धवराव लंके, पिंटू पडवळ, संदीप पोखरकर, संजय पोखरकर,मयूर सरडे, संकेत वायकर माजी विद्यार्थी प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयराजे वाळुंज, खजिनदार भाऊसाहेब गायकवाड, चंद्रकात गायकवाड, हेमंत पडवळ, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळशिराम वाळुंज व लोणी ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# सीएसआर फंडातून श्री ज्ञानेश्वर विद्यालयात सौरऊर्जा प्रकल्प उभारला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेत झारखंड येथील 'रॉकवेल ऑटोमोशन' कंपनीच्या सीएसआर निधीतून १० किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पाची यशस्वी उभारणी करण्यात आली. हॅबिटॅट इंडिया या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सौरऊर्जा निर्मितीचा उपक्रम राबवण्यात आला असून, पर्यावरण संवर्धनासोबतच ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना अखंड वीज उपलब्ध करून देण्याचा या प्रकल्पाचा



उद्देश आहे.कंपनीचे विभागीय व्यवस्थापक बुरानउद्दीन बोहरा व प्रोग्रॅम मॅनेजर सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाने हा प्रकल्प प्रत्यक्षात आला. विद्युत तांत्रिक सहकार्य टेक्निशियन राहुल सागर यांनी दिले. प्रकल्पाचे उद्घाटन शेखर जांभुळकर, भारती सहकारी बँकेचे अध्यक्ष सीए बी.बी.कड आणि भीमाशंकर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव अजित वडगावकर, खजिनदार डॉ.दीपक पाटील, विश्वस्त एल.जी.घुंडरे, प्राचार्य एस.जी.मुंगसे व मुख्याध्यापक प्रदीप काळे उपस्थित होते. वारकरी सांप्रदायातील व ग्रामीण पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्थेने दाखवलेली तळमळ, शैक्षणिक गुणवत्ता, समाजोपयोगी उपक्रमांतून केलेले योगदान आदी घटक लक्षात घेऊन देशभरातील १०० शाळांमधून श्री ज्ञानेश्वर विद्यालयाची निवड करण्यात आली.

# आंबेगाव तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी विशाल वाबळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुका अध्यक्षपदी खडकी ( ता. आंबेगाव) येथील विशाल वाबळे यांची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रमोद गोतारणे यांनी हे निवडीचे पत्र विशाल वाबळे यांना दिले. मंचर येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष मेळाव्यात पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष जगन्नाथबापू शेवाळे, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम, युवक अध्यक्ष प्रमोद सिंह गोतारणे, दामु घोडे व आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सदर निवडीचे पत्र दिले आहे. यावेळी सत्काराला उत्तर देताना विशाल वाबळे म्हटले की आंबेगाव तालुक्यातील सर्व गावांमध्ये संघटनात्मक कामाला प्रथम प्राधान्य देवुन गावागावात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे संघटनात्मक काम मी करणार आहे तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे विचार व पक्षाची ध्येयधोरणे घराघरात पोहचवणार असल्याचे विशाल वाबळे यांनी निवडीनंतर सांगितले. विशाल वाबळे यांनी लोकसभा निवडणुकीत खासदार डॉ अमोल कोल्हे यांच्या प्रचारात महत्वाची भूमिका बजावली होती. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासोबत ते सामाजिक कार्यात नेहमी सहभागी असतात. विशाल वाबळे यांची निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# भोरला पर्यटनामुळे रोजगाराला चालना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्याला निसर्गाचे वरदान लाभले आहे.दरवर्षी पावसाळ्यात निसर्ग संपन्न भोर आणि परिसरातील गड, किल्ले, धार्मिक स्थळे, डोंगररांगा पर्यटकांना खुणावू लागतात. डोंगरदऱ्यातून खळखळ वाहणारे पाणी, कोसळणारे धबधबे, हिरवी वनराई पर्यटकांना साद घालू लागते .नीरा देवघर, भाटघर धरणाचे बॅक वॉटर, दुथडी भरून वाहणारी नीरा तसेच गुंजवणी नदी, प्रसिद्ध नेकलेस पॉईंटची पर्यटकांना भुरळ पडते आणि पावले या परिसराकडे



आपोआप वळू लागतात. मागील दीड महिन्यांपासून वरूणराजाने दमदार हजेरी लावल्याने भोरचे निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करु लागले आहेत. परिणामी या परिसरात सध्या लहान मोठ्या व्यावसायिकांनी खाद्यपदार्थांची दुकाने थाटली असून चांगली आर्थिक उलाढाल होतं असल्याचे सांगितले. पर्यटक वाढल्याने विविध भागातील हॉटेल, ढाब, फार्म हाऊसवर खवय्ये पर्यटक गर्दी करू लागले आहेत. आषाढ महिन्यात मांसाहाराला चांगली पसंती मिळत असल्याचे निगुडघर (ता.भोर )येथील हॉटेल व्यवसायिक शशिकांत (आबा )बांदल यांनी सांगितले. किल्ले रायरेश्वर, क्षेत्र बनेश्वर, नेकलेस पॉईंट, बालाजी मंदिर, आंबवडे येथील झुलता पूल, वरंधा घाट पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करत असून या परिसरात चित्रकार, अक्षरलेखक, कलाकार मंडळी पर्यटकांच्या मागणीनुसार त्यांची रेखाचित्रे रेखाटून देत आहेत. एकाचित्रासाठी शंभर ते दोनशे रुपये मिळत असून कलाकार मंडळींना चांगले उत्पन्न मिळत असल्याचे सुलेखनकार वसंत अभिमन्यू यांनी सांगितले.

### पोलीस नसल्याने रस्त्यावर हुल्लडबाजी !

**सध्या भोर आणि परिसरात चांगला पाऊस झाल्याने पुणे आणि परिसरातील पर्यटक भोर , राजगड परिसरात पर्यटनासाठी येतात.बरीच पर्यटनस्थळं रस्त्यालगत असल्याने पर्यटक रस्त्यावर वेडीवाकडी वाहने उभी करत असल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण करत आहेत.पोलीस बंदोबस्त नसल्याने रस्त्यावर हुल्लडबाजी करण्याचे प्रमाण वाढले असून चारचाकी वाहनांमधून आलेले तरुण पर्यटक कर्णकर्कश आवाजात गाणी लावत असून रस्तावर धांगडधिंगाणा घालत आहेत.तसेच मज्जाव असलेल्या निर्जन ठिकाणी पर्यटक जात असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.त्यामुळे पर्यटक गर्दी करत असलेल्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.**

द•ख•ल

# कारेगाव येथे शेतकरी ओळखपत्र कॅम्प संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव:**१३ जुलै रोजी तालुक्यातील मौजे कारेगाव येथे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यककारेगाव येथे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शेतकरी



ओळखपत्र काढण्याकरिता कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कारेगाव येथील शेतकरी यांचे शेतकरी ओळखपत्र(फार्मर्स खू) काढण्यात आले. यावेळी ग्राममहसूल अधिकारी सोनल गोलवड बोलताना म्हणाल्या की भविष्यात शेतक-यांना विविध योजनाचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र हे ,बंधनकारक असुन त्यामध्ये पंतप्रधान पीक विमा योजना, खरीप हंगाम २०२५, महाडीबीटी वरील शेतकरी योजना, नैसर्गिक अप्पती मधील शेती पिकांची नुकसान भरपाई, पीएम किसान व नमो शेतकरी सन्मान निधी योजना, शेतजमीन खरेदी/ विक्री,नवीन पीक कर्ज व पीक कर्ज माफी या सर्व योजनांचा शेतकरी ओळख पत्राच्या माध्यमातून लाभ घेता येणार आहे.तरी ज्या शेतक-यांनी शेतकरी ओळखपत्र (फॉर्मर आयडी) काढलेला नाही आशा राहिलेल्या उर्वरित शेतक-यांनी काढुन घ्यावा ज्या शेतक-यांनी शेतकरी ओळखपत्र काढले नाही त्यांना कुठल्याही शासकीय योजनेचा लाभ मिळू शकणार नाही असे ग्राममहसूल अधिकारी सोनल गोलवड यांनी बोलताना सांगितले. यावेळी कारेगावचे सरपंच वैशाली भगवान दहिफळे, अशोक दहिफळे, सुवर्णा रामदास भाबड,सुभाष भाबड,तुकाराम दहिफळे,अमोल भाबड , अश्रूबा भाबड,भगवान दहिफळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिसगाव उपबाजार समितीत सर्व सुविधा देऊ: बर्डे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**करंजी :** तिसगाव बाजार समितीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये उलाढाल होत असून या बाजार समितीत सर्व पूरक सेवा सुविधा देणार असल्याचे पाथर्डी बाजार समितीचे सभापती सुभाषराव बर्डे यांनी सांगितले.तिसगाव उप बाजार समितीमध्ये नियोजीत कामाची संचालक मंडळाने पाहणी केली यावेळी बर्डे बोलत होते.

यावेळी बोलताना बर्डे म्हणाले की जून २०२३ मध्ये आ.मोनिकाताई राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळांने कामकाज पाहण्यास सुरुवात केली. दोन वर्षांमध्ये पारदर्शक व्यवहार व सार्वत्रिक हिताला प्राधान्य देत बाजार समितीने आर्थिक प्रगती साधली. दोन वर्षात दोन कोटी पेक्षा जास्त विकास कामे करण्यात आली. प्रलंबित अतिक्रमण प्रश्न सामोपचाराने सोडवले.वर्ष २०२४/२५ या आर्थिक वर्षात पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीला सुमारे ७६ लाख रुपयांचा नफा झाला आहे.खरवंडी आणि तिसगाव बाजार समितीमध्ये वजन काटे सुविधा निर्माण केली. पाथर्डीच्या कार्यालयावर सोलर यंत्रणा बसवली त्यामुळे वीज बचत झाली आहे. शेतकरी निवास , मिरी उपबाजार साठी जमीन खरेदी अशी काही कामे प्रस्तावित आहेत ते लवकरच सोडविले जातील असे बर्डे यावेळी सांगितले. यावेळी सचिव बाळासाहेब बोर्डे , संचालक शेषराव कचरे, जिजाबा लोंढे, अरुण रायकर ,वैभव खलाटे, नारायण पालवे, डॉक्टर पांडुरंग लाड आदी उपस्थित होते.

# श्रीरामपूरची वाढीव पाणीयोजना वेळेत पूर्ण करा : ना.विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:** श्रीरामपूर शहराची गरज लक्षात घेऊन महायुती सरकारने १७८ कोटी रुपयांच्या निधीतून वाढीव पाणीपुरवठा योजनेस मंजुरी दिली. या योजनेचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करा, अशी सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नगरपालिकेला केली. श्रीरामपूरमधील विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत आज, शनिवारी झाला. यावेळी त्यांनी वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची पाहणी केली. मंत्री विखे म्हणाले, महायुती सरकारने सन २०५१ ची लोकसंख्या गृहीत धरून २६.३६ दक्षलक्ष लिटर पाणी प्रति दिन लागण्याचा आराखडा तयार केला. जल शुध्दीकरण केंद्राचे फिल्टर बेडचे खोदकाम पूर्ण झाले, दगडी सोलिंग व क्राँकीटचे काम प्रगतिपथावर असल्याची माहिती मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी सांगितली. नवीन उंच जलकुंभाचे काम जुने बांधकाम पाडल्यानंतर हाती घेण्यात येणार असून, वितरण व्यवस्थेसाठी ५९ किमी. पैकी १७ किमी. जलवाहिनीचे काम पूर्ण आहे. योजनेच्या तलावाचे सर्वेक्षण पूर्ण करून बोअर कोअर चाचणी झाली. तलावाचे खोलीकरण निर्धारित वेळेत पूर्ण करून आरसीसी काम करण्यात येणार आहे. नंतर तळातील मातीचा थर प्लास्टिक शीट वाळूचा थर आदी काम पूर्ण करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. योजनेच्या कामात त्रूटी राहणार नाही याकडे लक्ष देण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, माजी नगराध्यक्ष संजय फंड, दीपक पठारे, केतन खोरे, नानासाहेब पवार, नानासाहेब शिंदे, शरद नवले, प्रांताधिकारी किरण सावंत पाटील आदी उपस्थित होते.

# विकास मंडळाच्या गाळेधारकांना धर्मादाय आयुक्तांची नोटीस

## भाडेकरार न करता थकबाकी, २५ जुलैला सुनावणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** - येथील लाल टाकी परिसरातील अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या गुरुकुल इमारतीतील १९ गाळेधारकांना भाडे थकविल्याप्रकरणी विकास मंडळाने दाखल केलेल्या दाव्या नुसार धर्मदाय आयुक्त पुणे यांनी नोटीस बजावली असून २५ तारखेला याबाबत अंतिम सुनावणी होणार असून यावेळी हजर राहण्याचे आदेश कार्यालयाने काढले आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती अशी की जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या मालकीच्या अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ या संस्थेची लाल टाकी परिसरात गुरुकुल नावाची इमारत असून या इमारतीमध्ये एकूण २७ भाडेकरू आहेत त्यापैकी १९ भाडेकरूंनी गेल्या अनेक वर्षाचे गाळ्यांचे भाडे थकविले आहे तसेच आपल्या भाडेकराराचे दर तीन वर्षांनी करावयाचे नूतनीकरण देखील केलेले नाही. त्यामुळे विकास मंडळाच्या या भाडेकरूंकडे मोठ्या प्रमाणात भाडे थकबाकी आहे . या संदर्भात विद्यमान विश्वस्त मंडळाने या भाडेकरूशी वेळोवेळी संपर्क साधून नियमानुसार भाडेकराराचे नूतनीकरण करण्यासंदर्भात आवाहन केले होते. मात्र त्याला १९ जणांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने शेवटी विकास मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद भालेकर यांनी धर्मादाय आयुक्त पुणे विभाग यांच्याकडे दावा दाखल केला आहे. त्यानुसार या सर्वांना नोटीसा पाठविण्यात आल्या असून त्याची सुनावणी २५ तारखेला होणार आहे. चाळीस वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या विकास मंडळाची गुरुकुल नावाची इमारत जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या वर्गणीतून उभी राहिली आहे. त्या ठिकाणी जे गाळेधारक भाडेकरू टाकलेले आहेत त्यांनी वेळोवेळी भाडे कराराचे नुतनीकरण करणे आवश्यक होते तसेच नियमानुसार भाडेवाढ करणे देखील अपेक्षित होते.मात्र शिक्षकांच्या राजकारणात मागील विश्वस्त मंडळांनी या बाबींकडे दुर्लक्ष केले. यातील बहुतेक भाडेकरूंनी पोट भाडेकरू टाकले असून ते परस्पर भाडे वसूल करतात. मात्र विकास मंडळाचे नुकसान करतात. या संदर्भात विद्यमान विश्वस्त मंडळाने प्रथमतः त्यांच्याशी संपर्क करून त्यांना विनंती केली,नंतर वकिलामार्फत नोटीस दिली.त्यालाही फारशी दाद न दिल्याने अखेर विश्वस्त मंडळाने धर्मादाय आयुक्तांकडे दावा दाखल केला आहे. विकास मंडळाची वार्षिक सभा लवकरच होणार असून या सभेत या इमारतीतील सर्व गाळे रिकामे करून घेऊन नवीन करार करून लिलाव पद्धतीने भाडे करार करून भाडेकरू टाकण्यात यावेत अशी मागणी जिल्ह्यातील विकास मंडळाच्या सभासदांनी केली आहे.



नगर शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या इमारतीचे गाळेधारकांचे भाडे अत्यंत अल्प असून ते सुद्धा वेळेत आदा होत नसल्याने विकास मंडळ तोट्यात चालले आहे. परिणामी शिक्षकांच्या विकासाच्या संदर्भात कोणतेही काम करणे शक्य झालेले नाही. या इमारतीत असलेल्या गाळ्यांचे भाडे चालू बाजारभावाप्रमाणे करार केल्यास लाखो रुपये उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. मात्र जुन्या भाडेकरूंना शिक्षकांच्या राजकारणातील काही पुढाऱ्यांचे अभय असल्याने ते भाडेकरार करण्यास टाळत असल्याची माहिती सचिव संतोष आंबेकर यांनी दिली

मागील विश्वस्त मंडळांनी या भाडे वसुली बाबत कोणतीही कारवाई केली नसल्याने ही थकबाकी वाढत गेल्याची चर्चा देखील आहे.याबाबत आता धर्मादाय आयुक्तांच्या निर्णयाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. गेल्या अनेक वर्षापासूनचा रखडलेला भाडेकरारचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी चालना दिल्याबद्दल जिल्ह्यातील सभासदांकडून अध्यक्ष प्रल्हाद भालेकर,सचिव संतोष आंबेकर,उपाध्यक्ष दिलीप गंभीरे,खजिनदार सुवर्णा राठोड,माजी अध्यक्ष विलास गवळी,प्रदीप दळवी,माजी उपाध्यक्ष नवनाथ दिवटे,संजय शेंडगे,माजी सचिव संतोष मगर,विश्वस्त राजेंद्र निमसे मुकुंदराज सातपुते,गणेश गायकवाड,चांगदेव काकडे,बाळासाहेब गमे, दत्तात्रय फुंदे, मनीषा गाढवे (शिंदे),अनिता उगले (नेहे) उर्मिला राऊत, स्वीकृत विश्वस्त सलीमखान पठाण, व्यवस्थापक सुरेंद्र आढाव यांचे अभिनंदन केले आहे.

# श्रीगोंद्यात अजूनही जात पंचायतीचा पगडा कायम ?

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील लिंपणगाव हद्दीतील लोकांना काही दिवसापूर्वी जात पंचायतीच्या पंचानी बहिकृत केल्यावर त्यांना पुन्हा जातीत येण्यासाठी आजही अनोखा संघर्ष करावा लागत असून आजही त्यांना वेगळी वागणूक दिली जात असल्यामुळे आज पुन्हा समाज एकवटला होता परंतु माजी मंत्री बबनराव पाचपुते पोलीस यांच्या मध्यस्तीने दंडात्मक रक्कम भरून वाद मिटविण्यात आला आहे . श्रीगोंदा तालुक्यातील विशिष्ट समाज्यात आजही जात पंचायतीचा पगडा अजूनही काही ठिकाणी आहे,खासकरून ग्रामीण भागात. अनेक ठिकाणी जात पंचायत अजूनही सामाजिक निर्णय घेते आणि लोकांना त्यांच्या निर्णयांचे पालन करण्यास भाग पाडते, जरी ते बेकायदेशीर असले तरी त्याची कायद्यापेक्षा कठोर पालन केले जात आहे . श्रीगोंदा कारखाना येथील



जोशीं वस्तीवर जातपंचायत चालू असताना मोबाईल वर व्हिडीओ घेण्याचा वादातून मोठा वाद उफाळून आल्याने अनेक जनाला मोठ्या प्रमाणात मारहाण झाली होती त्यांच्या परस्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्या असून तब्बल ६६ जनावर गुन्हे दाखल झाले होते त्यातील अनेकांना जेलची हवा मिळाली होती त्यावेळी २०१८ साली जात पंचायत बरखास्त केली होती तरीही अनेक लोकांना जात पंचायतीचे अनुभव आल्याने गुन्हे दाखल केले होते. तरीही तालुक्यातील अनेक लोकांना जातीमध्ये घेतेले जात नव्हते विविध कार्यक्रमात त्यांना टाळले जात असल्यामुळे आज पारगाव रोडवरील पटांगणात आज समाजबांधव एकवटले होते त्यावेळी शिवसेनेच्या महिला जिल्हा प्रमुख मीरा शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांच्या मध्यस्थीने चर्चा सुरु होती मात्र कसलाही पद्धतीने वाद मिटत नसल्यामुळे शेवटी पोलीस निरीक्षक व माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या मध्यस्थीने ११०० रुपये दंड भरून दाखल झालेले गुन्हे माघारी घेण्याच्या अटीवर त्यांना पुन्हा जातीत घेण्यात आले आहे.

# पाथर्डीत पुन्हा बनावट नोटांचा सुळसुळाट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**पाथर्डी:** शहर आणि तालुक्यात पुन्हा एकदा पाचशेच्या बनावट नोटांचा सुळसुळाट झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील एका किराणा दुकानदाराला तीन दिवसांपूर्वी एका ग्राहकाने सामान खरेदी करताना पाचशे रुपयांची बनावट नोट दिली.व्यवहारानंतर दुकानदाराच्या लक्षात ही बाब दुसऱ्या दिवशी लक्षात आले.प्राथमिक चौकशीत ही नोट बनावट असल्याचे स्पष्ट झाले.यामुळे पुन्हा एकदा पाथर्डी शहरात बनावट नोटांचे रॅकेट सक्रिय झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तालुक्यात यापूर्वीही बनावट नोटा प्रकरणी काही घटना घडल्या होत्या.पाथर्डी तालुक्यातील दोन आरोपींना पर जिल्ह्यात बनावट नोटा बाळगून त्या चलनामध्ये वापरताना दुकानात खरेदी करत असताना दुकानदाराच्या मदतीने पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते.त्यापैकी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते, तर दुसरा फरार झाला होता.त्यामुळे हे रॅकेट केवळ शहरी भागापुरते मर्यादित न राहता आता ग्रामीण भागातही शिरकाव करत असल्याचे चित्र आहे.

पाथर्डी शहरातील मुख्य बाजारपेठेसह छोट्या दुकानांत, टपऱ्यांवर, हातगाड्यांवर आणि रस्त्यावर विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना बनावट नोटा स्वीकारण्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.मागील काही काळात अनेक प्रकारचे आर्थिक गुन्हे आणि फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत.स्थानिक गुन्हेगारी प्रवृत्तीचे काही लोक बनावट नोटांच्या रॅकेटमध्ये सहभागी असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

# शेत व वहिवाटीचे रस्ते अडवणाऱ्यांवर कारवाई करणार : डोंगरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव:** श्रीगोंदा तालुक्यात शेत रस्ते, पानंदरस्ते, शिव रस्ते, वहिवाटीचे रस्ते इत्यादी रस्त्यांबाबत शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी आहेत. त्यामध्ये तहसीलदार कोर्टात देखील ही प्रकरणे मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, ज्या रस्त्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत, व जी प्रकरणे अंतिम टप्प्यात आहेत ते तात्काळ प्राधान्याने हाती घेतले जातील, सदर प्रकरणे जुलै अखेर मार्गी लावण्याचा प्रयत्न असल्याचे श्रीगोंद्याचे तहसीलदार सचिन डोंगरे यांनी आयोजित शेतपानंद रस्ते चळवळीच्या बैठकीत बोलताना सांगितले. श्रीगोंदा तहसील कार्यालयात शेत पानंद रस्ते चळवळीच्या आव्हानानुसार शेत रस्ते शिवरस्ते पानंद रस्ते या अन्यायग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात तहसीलदार सचिन डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी शेतपानंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका भूमापनचे अधिकक्षक सुहास जाधव, पंचायत समितीचे विस्तार अधकारी संजय वाघ, शिवपानंद चळवळीचे ॲड. गोरख कडूस, पत्रकार नंदकुमार कुरुमकर हे यावेळी उपस्थित होते. या आयोजित बैठकीस तालुक्यातील अनेक अन्यायग्रस्त शेतकरी रस्त्याच्या प्रश्नसंदर्भात दाद मागण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर अनेकांनी रस्ते अडवल्याच्या भावना पोटतिडकेने तहसीलदारांसमोर मांडल्या.पुढे



बोलताना तहसीलदार सचिन डोंगरे म्हणाले की, तालुक्यातील अन्यायग्रस्त शेत रस्ता, वहिवाट रस्ता या समस्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न जाणून घेतले तहसील कोर्टात जवळपास ९१ शेत रस्ते वहिवाट रस्ते अडवल्याची प्रकरणे होती. त्यामध्ये ५२ केसेस स्थळ पाणी होणे बाकी असल्याने या शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नासंदर्भात आठवड्यातील दोन वार प्रामुख्याने बुधवार आणि गुरुवार हे शेत रस्ते वहिवाट रस्त्या संदर्भात आढावा घेतला जाईल. असे सांगून तहसीलदार डोंगरे पुढे म्हणाले की, रस्त्यांच्या वादविवाद या प्रश्नासंदर्भात गावांची यादी तयार करून त्यानुसार तात्काळ प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याचा प्रयत्न करू, असे सांगून श्री डोंगरे पुढे म्हणाले की, ज्या शेत रस्ते व वहिवाट रस्ते बाबत स्थळ पाहणी झाली. ती प्रकरणे देखील तात्काळ मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. कारण प्रकरणे जलद गतीने मार्गी लावण्याचा प्रयत्न असल्याचा हेतू त्यांनी यावेळी सांगितला. त्याबरोबरच तक्रारीनुसार नोटीस काढल्यानंतर त्या कामी वादी प्रतिवादीने हजर राहावे तर शेतकऱ्यांनी ज्या त्या कलमाखाली अर्ज केलेला असावा. तर जे शिवरस्ते, शेत रस्ते नकाशावर आहेत. ते तात्काळ खुले करण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत. , तहसील कार्यालयात जवळपास १७लोकांचा स्टाफ आहे. त्यामध्ये दहा कर्मचारी कमी आहेत. तर त्यातील तीन कर्मचारी बिनकामाचे आहेत. त्यामुळे या रस्त्यांच्या प्रश्नासंदर्भात व इतर कार्यालयीन कामामुळे रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यास अडचण निर्माण होत आहे. आता या प्रश्न नियोजनबद्ध कार्यक्रम राबवून शेत रस्ते वहिवाट रस्ते तात्काळ खुले करण्यासाठी ज्या त्या ग्रामपंचायतीमध्ये वादी प्रतिवादीशी समन्वय साधून रस्त्यांच्या वादा संदर्भात प्रश्न मार्गी लावण्याचा करणार असल्याचे तहसीलदार डोंगरे यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी शेतपानंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील हे मार्गदर्शन करताना म्हणाले, की तात्कालीन तहसीलदार डॉ क्षितिजा वाघमारे यांनी शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेत शेतपानंद शेत रस्ते, वहिवाटीचे रस्ते मार्गी लावण्यासाठी मोठी मोहीम हाती घेतली होती. त्यामध्ये अप्पर तहसीलदार प्रवीण मुदगुल, भूमापनचे तालुका अधिक्षक सुहास जाधव, वासुदेव पाटील यांनी देखील या कामी शेत पानंद रस्ते चळवळीच्या आव्हानाला प्रतिसाद देत मोठी मोहीम सुरू केली होती. परंतु मध्यंतरी प्रशासकीय अडचणीमुळे ही प्रकरणे प्रलंबित राहिली. आता तालुक्याला तहसीलदार सचिन डोंगरे यांनी देखील महसूल विभागाच्या आदेशानुसार शेत रस्ते, शिवरस्ते, पानंद रस्ते, इत्यादी प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शेतपानंद रस्ते चळवळीला सहकार्य करत आहेत. निश्चितपणे शेतरस्ते, वहिवाट रस्ते पानंद रस्त्यांची प्रलंबित प्रश्न मार्गी लावतील, अशी अपेक्षा श्री जंगले यांनी व्यक्त केली यावेळी सहाय्यक महसूल अधिकारी संतोष झाडे यांनी मागील बैठकीचे इतिवृत्ताचे वाचन केले आभार शेतपानंद चळवळीचे राज्य समन्वय ॲड. गोरख कडूस, यांनी मानले

# तालुका क्रीडा शिक्षक समितीच्या अध्यक्षपदी शिरसाठ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी:**अहिल्यानगर येथे पार पडलेल्या जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा शिक्षण विभाग आयोजित बैठकीत पाथर्डी तालुका क्रीडा शिक्षक समितीच्या अध्यक्षपदी राजेंद्र (पप्पु) शिरसाट यांची सलग पाचव्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. गेल्या चार वर्षांत पप्पु शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यामध्ये राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा,विभागीय बुद्धिबळ स्पर्धा,जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्या असून या उपक्रमांमुळे पाथर्डी तालुक्याचे नाव राज्यपातळीवर अधोरेखित झाले आहे. या काळात तालुक्यातील अनेक खेळाडूंनी राज्यस्तर तसेच राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, शहरी भागापुरते मर्यादित न ठेवता शिरसाट यांनी ग्रामीण भागातील



विद्यार्थ्यांमध्येही क्रीडा जागृती निर्माण केली. त्यांनी विविध शाळांमध्ये स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून खेळाडूंना आपले कौशल्य सादर करण्याची संधी उपलब्ध करून दिली. पप्पु शिरसाट हे स्वतः कुस्तीचे राष्ट्रीय खेळाडू असून, सध्या एम.एम. निहाळी उच्च माध्यमिक विद्यालयात क्रीडा शिक्षक व कोच म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे तालुक्यातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट झाली आहे.

या बैठकीत नव्याने गठित समितीत उपाध्यक्ष म्हणून अविनाश घुगे, सचिव अजय शिरसाट, सहसचिव एकनाथ पालवे, तर खजिनदार म्हणून रामदास दहिफळे यांची निवड झाली. या निवडीबद्दल एकलव्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रताप ढाकणे, पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतिष गुगळे, सहदेव दादा शिरसाट शिक्षण संस्थेचे सचिव महेंद्र शिरसाट, प्राचार्य बबन चौरे, प्रा.संजय घिगे, प्रा. अजय भंडारी, प्रा. कल्पजित डोईफोडे, प्रा. सुरेश मिसाळ आदींनी शिरसाट यांना अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# घोगरगाव विद्यालयाच्या १८ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** घोगरगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयाने पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करत उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.इयत्ता पाचवीमधील विद्यार्थीनी आरोही सचिन गारुडकर हिने २७६ गुण मिळवत राष्ट्रीय ग्रामीणमधून सहावा क्रमांक मिळवला.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत ५४ विद्यार्थ्यांपैकी ३३ विद्यार्थी पात्र ठरले असून आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. यात आरोही सचिन गारुडकर २७६, संस्कृती योगेश शेळके २५८, आदित्य बाबासाहेब जगताप २५०, समर्थ सुनील जगताप २४८, समृद्धी दत्तात्रय बोरुडे २४२, नामेश दत्तात्रय वाघ २३६, समीक्षा भरत गांगर्डे २३६, आराधना विनायक धामणे २३६ या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पाचवी शिष्यवृत्ती विभागप्रमुख व




वर्गशिक्षक सचिन गारुडकर , सतीश गोरे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ३० विद्यार्थ्यापैकी २५ विद्यार्थी पात्र ठरले असून १० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले. रमाकांत हरिभाऊ महाडिक २३२, मयूर अशोक वाळके २२६, दिग्विजय युवराज शेळके २१४, आदित्य सचिन शिंदे २१०, अजय संभाजी वाळके २०८, करण दत्तात्रय बागल २०८,समृद्धी सुनील वाघुले २०८, अर्जुन श्रीराम बोरुडे २०२,जय अशोक कुलांगे २०२ व अभ्यंक प्रदीप भोस १९८ या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

आठवी शिष्यवृत्ती विभागप्रमुख सतीश गोरे , दत्तात्रय हजारे, संदीप गावडे व अंबादास कोथिंबीरे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे माजी सदस्य बाबासाहेब भोस, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, बाबासाहेब नाईकवाडी, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाजीराव कोरडे, विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य नामदारभाई शेख, राजेंद्र उगले, उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे सदस्य तानाजी बोरुडे, घोगरगावच्या सरपंच सुजाताताई भोसले, उपसरपंच दिलीप भोस, घोगरगावचे माजी सरपंच बाळासाहेब उगले, विद्यालयाचे प्राचार्य वसंत नरवडे, पर्यवेक्षक प्रवीणकुमार लोंढे, माजी पर्यवेक्षक सुरेश काळे,गुरुकुल प्रमुख दत्तात्रय हजारे, सर्व पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री



## शनिशिंगणापूर ॲप घोटाळाप्रकरणी सायबर पथकाची कारवाई सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : शनिशिंगणापूर देवस्थानातील बहुचर्चित ॲप घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर अखेर पोलिस यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. अहिल्यानगर येथील सायबर क्राईम पथकाने थेट देवस्थानच्या कार्यालयात जाऊन सविस्तर पाहणी करत स्थळ पंचनामा केला आहे. देवस्थानच्या संगणक विभागासह संपूर्ण कार्यालयीन यंत्रणेची माहिती घेऊन, प्राथमिक तपासासाठी महत्वाचे पुरावे गोळा करण्यात आले आहेत. सायबर पथकाने ट्रस्ट परिसरातील पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर भागाची व्हिडिओ शूटिंग करण्यात आली आहे. प्रत्येक विभागाची बारकाईने तपासणी केली. देवस्थान कार्यालयातील संगणकप्रणाली, नोंदी, ऑनलाइन दान व बुकिंग प्रक्रियेत झालेली अनियमितता, तसेच शनीदेवाला अर्पण होणारे तेल कुठे व कशा पद्धतीने साठवले जाते, याचा सखोल आढावा घेण्यात आला.

कारवाईदरम्यान ट्रस्टचे अध्यक्ष, कार्यकारी अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी झाली असून, त्यांचे जबाबही नोंदवण्यात आले आहेत. या चौकशीतून महत्त्वाची माहिती बाहेर येण्याची शक्यता आहे.गेल्या दोन महिन्यांपासून गाजत असलेला ५०० कोटींचा ऑनलाईन ॲप घोटाळा दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहे. लाखो भक्तांनी श्रद्धेने दिलेले दान, डिजिटल व्यवहारांतील अपारदर्शकता, तसेच ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांवर उठलेले संशयाचे धुके अजूनही निवळलेले नाही. या प्रकरणात ट्रस्ट प्रशासनाचे जबाबदारी झटकण्याचे प्रयत्न जनतेच्या रोषाला सामोरे जात आहेत. यामध्ये सर्वेसर्वा विश्वस्त मंडळाची कायदेशीर जबाबदारी असून, या प्रकरणातील मुख्य आका शोधण्याचे आव्हान तपाली अधिकाऱ्यांपुढे आहे.मुख्यमंत्र्यांच्या विधानसभेतील स्पष्ट घोषणेनंतरच तपास यंत्रणा सक्रिय झाली असून, सायबर पथकाकडून प्राप्त माहितीचा सखोल तपास सुरू आहे. लवकरच प्राथमिक अहवाल सादर केला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, ग्रामस्थ व शनीभक्तांमध्ये संतप्त भावना असून, दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी आहे. सध्या तपासाची दिशा गुप्त ठेवण्यात आली असून, कारवाईचं पुढचं पाऊल कोणावर पडतं, याकडे लक्ष लागले

## सराफी दुकान फोडून सोन्या-चांदीचा ऐवज चोरला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : चारचाकी वाहनात आलेल्या अज्ञात भामट्यांनी काल (दि. १४) पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास शहरातील भरबाजारपेठेतील सराफ व्यावसायिक राजेंद्र भन्साळी यांचे सोन्याचे दुकान फोडून लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

भन्साळी यांचे शहरातील जुनीपेठ येथे वर्धमान ज्वेलर्सचे सोने, चांदीचे दुकान आहे. भन्साळी १३ जुलैला रात्री नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घरी गेले होते. काल सकाळी ६.३० वाजे दरम्यान भन्साळी यांचे दुकानचे शटर थोडे उघडे दिसले. तेव्हा चोरी झाल्याचा प्रकार उघडकीस आला. दरम्यान एका पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून आलेल्या अज्ञात भामट्यांनी पहाटे दोन ते अडीच वाजे दरम्यान प्रथम भन्साळी यांच्या दुकान समोरील सीसीटिव्ही कॅमेऱ्यावर स्प्रे मारला. नंतर शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. दरम्यान भामट्यांनी दुकानात उचकापाचक करून ड्रॉव्हरमधील सुमारे २५ ते ३० तोळे सोन्याचे दागिने व सुमारे २५ किलो चांदीचे



(छाया : राजेंद्र परदेशी)

दागीने चोरुन नेले. जाताना दुकानातील सीसीटिव्ही कॅमेऱ्याचे डिव्हीआर घेऊन गेले. घटनेची माहिती मिळताच श्रीरामपूर येथील उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पथकाचे जिल्हा पोलीस प्रमुख दिनेश आहेर, हवालदार मनोज गोसावी, गणेश भिंगारदे, रमीजराजा आतार, राहुरी येथील पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदाम शिरसाट, पोलिस उपनिरीक्षक संदिप मुरकुटे, हवालदार विजय नवले, प्रमोद ढाकणे, संदिप ठाणगे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. त्यानंतर अहिल्यानगर येथील ठसे तज्ञ व श्वान पथकाने घटनास्थळी येऊन आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी सीमा नामक श्वान जागेवरच घुटमळले. त्यामुळे तपास कामात अडचणी निर्माण झाल्या.

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, तनपुरे कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, संचालक हर्ष तनपूरे, काँग्रेसचे नेते चाचा तनपुरे, माजी नगराध्यक्ष अनिल कासार, उपनगराध्यक्ष सूर्यकांत भुजाडी, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश पारख, संजीव उदावंत आदीसह शहरातील व्यापारी व इतर नागरिक घटनास्थळी उपस्थित होते.

### व्यापारी एकवटले

चोरीची घटना झाल्याचे समजताच राहुरीतील सर्व व्यापारी भन्साळी यांच्या दुकानासमोर जमा झाले. त्यांनी चोरीचा निषेध करून पोलिसांनी तात्काळ या दरोडेखोरांना पकडून जनतेसमोर आणण्याची मागणी केली. पोलिसांनी वेळीच पावले उचलली नाही तर आम्ही आंदोलन करू असा इशारा माजी नगराध्यक्ष अनिल कासार यांनी दिला आहे.

### व्यापाऱ्यांनी सहकार्य करावे

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी सर्व व्यापाऱ्यांना दुकानासमोरील सीसीटीव्हीचे कॅमेरे बसवून घ्यावेत. बंद असलेले चालू करावेत म्हणजे चोरीच्या प्रकाराला आळा बसण्यास मदत होईल आणि आरोपी सापडण्यासाठी पोलिसांनाही मदत होईल. त्यामुळे व्यापाऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन ठेंगे यांनी केले.

## डाव्या कालव्याला ओव्हरफ्लोचे पाणी सोडले : आ.आशुतोष काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी** : सुरुवातीला पडलेल्या दमदार पावसामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप पिकांच्या पेरण्या केल्या होत्या. परंतु जवळपास एक महिन्यापासून गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रात पावसाने उघडीप दिल्यामुळे खरीप हंगाम धोक्यात आला होता. त्यामुळे गोदावरी कालव्यांना तातडीने ओव्हरफ्लोचे पाणी सोडावे, अशी मागणी आ. काळे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. त्या मागणीची दखल घेऊन काल (सोमवार)पासून गोदावरी डाव्या कालव्याला ओव्हरफ्लोचे पाणी सोडण्यात आले असून उजव्या कालव्याला देखील लवकरच पाणी सोडणार असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली.

पावसाळा सुरु होऊन दीड महिन्याचा कालावधी पूर्ण होत आला तरी अद्यापपर्यंत कोपरगाव मतदारसंघात समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे अजूनही भूजलपातळी वाढलेली नाही. मात्र मे महिन्यात पावसाने दिलेली जोरदार सलामी व सोबतीला भरपूर पर्जन्यमान होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सोयाबीन, बाजरी, मका, कापूस, भुईमुग आदी खरीप पिकांच्या पेरण्या केल्या. मात्र मागील एक महिन्यापासून पाऊसच गायब झाल्यामुळे खरीप हंगाम धोक्यात येऊन शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या.

धरण क्षेत्रात मात्र समाधानकारक पाऊस होत असल्यामुळे सर्वच धरणांचा पाणीसाठा जवळपास ७५ टक्क्यांच्या आसपास पोहोचला असून नाशिकच्या धरणातून नांदूर मध्यमेश्वर बंधाऱ्यातून गोदावरी नदीमध्ये जायकवाडी धरणात जवळपास ३५ टीएमसी पाणी वाहून गेल्यामुळे धरणाचा पाणीसाठा ८० टक्क्यावर जाऊन पोहोचला आहे. असाच पाऊस सुरु राहिल्यास जुलै महिन्याच्या अखेरपर्यंतच जायकवाडी धरण १०० टक्के भरले जाणार असून अद्यापही ओव्हरफ्लोचे पाणी गोदावरी नदीत सोडले जात आहे. याकडे आ.काळे यांनी मंत्री विखे पाटील यांचे लक्ष वेधून पाणी सोडण्याची मागणी केली होती. कालव्यांना पाणी सोडल्यास भूजलपातळी वाढण्यास मदत होऊन शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी उपलब्ध होईल. अडचणीच्या काळात हेच पाणी खरीप पिकांना देता येईल व शेतकऱ्यांना आपले खरीप पीक वाचविता येणार असल्याचे सांगितले होते. त्या मागणीवरून कालपासून गोदावरी डाव्या कालव्याला ओव्हर फ्लोचे पाणी सोडण्यात आले आहे. उजव्या कालव्याला व पालखेड डाव्या कालव्यालादेखील पाणी सोडण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगतले.

## इटलीच्या यानिक सिनरने पटकावले विम्बल्डन जेतेपद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लंडन** : विम्बल्डन २०२५ स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात अग्रमानांकित यानिक सिनर इतिहास रचत दोनवेळच्या चॅम्पियन कार्लोस अल्कराझला पराभूत केले आणि इटालियन टेनिस स्टारने पहिल्यांदाच विम्बल्डन स्पर्धा जिंकली.याआधी पाचवेळा अल्कराझ आणि सिनर यांच्यात सामना झाला. ज्यात अल्काराझ भारी ठरला. पण विम्बल्डनच्या फायनलमध्ये पहिला सेट गमावल्यानंतर दमदार कमबॅक करीत इटालियन खेळाडू सिनरने विम्बल्डन स्पर्धेत नवा इतिहास रचला. त्याने दोन वेळा विजेत्या कार्लोस अल्काराझला ४-६, ६-४, ६-४, ६-४ अशा निकालाने पराभूत करून पहिल्यांदाच विम्बल्डनचा खिताब जिंकला. २३ वर्षांच्या सिनरने १९६८ पासून सेंटर कोर्टवर ट्रॉफी उंचावणारा २३ वा खेळाडू होण्याचा मान मिळविला. यापूर्वी फ्रेंच ओपनच्या अंतिम सामन्यातही अल्काराझने सिनरला ५ तास २९ मिनिटांच्या थरारक सामन्यात हरवले होते. अल्काराझचे सलग तिस-यांदा विम्बल्डन स्पर्धा जिंकण्याचे स्वप्न धुळीस मिळाले.

## एटीएम फोडण्याचा प्रयत्न असफल

### चोरट्यांना शोधण्याचे बेलापूर पोलिसांसमोर आव्हान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : येथील कोल्हार चौकातील इंडिया वनचे एटीएम फोडण्याचा दुसऱ्यांदा असफल प्रयत्न झाला. चोरट्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र तो असफल झाला. त्यामुळे चोरट्यांनी रिकाम्या हाताने पोबारा केला.

बेलापूर-कोल्हार चौकात असलेले सदरचे एटीएम यापूर्वीदेखील फोडण्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळी ग्रामस्थांनी पोलिसांना तातडीने खबर दिली. पोलीसही सायरन वाजवत तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सायरनचा आवाज ऐकताच चोरटे चार चाकी वाहनातून पसार झाले. काल पुन्हा चोरट्यांनी त्याच एटीएमला लक्ष केले. गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु एटीएम फुटले नाही. चोरट्यांनी एटीएमच्या ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर कागदी पट्ट्या लावल्या आणि नंतर एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. तथापी एटीएम फोडण्याचा प्रयत्न असफल झाल्याने सुदैवाने त्यातील रक्कम चोरट्यांच्या हाती लागली नाही. प्रयत्नास यश येत नसल्याचे पाहून चोरट्यांनी रिकाम्या हाताने तेथून पळ काढला. एटीएम मधील रक्कम सुरक्षित राहिली. सदरचे एटीएम फोडण्याचा दुसऱ्यांदा प्रयत्न झाल्याने चोरटे



आसपासच्या परिसरातील व या परिसराची माहिती असणारे असावेत, असा संशय व्यक्त केला जात आहे. याठिकाणी सी.सी.टि.व्ही.कमे-यांची निगराणी असतानाही एटीएम फोडण्याचा दुसऱ्यांदा प्रयत्न झाल्याने हे ठिकाण सुरक्षित नसल्याचे सिध्द होते. या प्रकारामुळे आजूबाजूचे दुकानदार व व्यावसायिकांत चिंतेचे वातावरण आहे. एटीएमची जागा बदलून ते सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करावे अशी मागणी केली जात आहे. यापूर्वी एटीएम फोडण्याच्या घटनेचा तपास लवण्यात पोलिसांना अद्याप यश आलेले नसताना दुसऱ्यांदा एटीएम फोडण्याची घटना घडल्याने या प्रकरणाचा शोध लावण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.

## आमदारांच्या गल्लीत रंगरंगोटी; भिंगारमध्ये मात्र कचराकुंड्यांचं स्वागत

### प्रभाग १४ मध्ये एका बाजूला फुलं-रंग, दुसऱ्या बाजूला ढिगारे-गटारे! नागरिक विचारतात, स्वच्छतेच्या जाहिराती फक्त पोस्टरपुरत्या का?



**अहिल्यानगर** : नगर शहराचा प्रभाग १४ - नाव घेताच थेट राजकारण डोळ्यासमोर येतं. कारण याच प्रभागात सत्ताधारी आमदार राहत आहेत. त्यांच्या गल्लीत फुलवाटिका, रंगीबेरंगी कंपाऊंड वॉल, झगमगते गेट उभे. भवानीनगर, सारसनगर, आनंदधाम, साईनगर, डॉक्टर कॉलनी या भागांत फुलांचे ताटवे, नव्या रंगात रंगवलेले भिंती, झाडं लावलेली दिसतात. पाहताना वाटतं, नगरच्या विकासाचं रोल मॉडेल इथंच आहे!

पण दुसरी बाजू? भिंगार परिसरात अजूनही उघडं गटार, ढिगाऱ्यांतून वाट काढणारी जनता, कुत्री-गायी प्लास्टिक खाताना दिसतात, दुर्गंधी, डास, रस्त्यावर खड्डे आणि प्रशासनाचा थंड प्रतिसाद!

प्रश्न पडतो - हा खरा प्रभाग १४ आहे का?

#### भिंगारमध्ये स्वागतच कचराकुंड्यांनी!

भिंगार परिसरात प्रवेश करताच स्वागत करतो मोठ्ठा कचऱ्याचा ढिगारा. वर्षानुवर्षं तक्रारी करूनही परिस्थिती बदललेली नाही. स्वच्छतेच्या जाहिराती फक्त पोस्टरपुरत्या; प्रत्यक्षात ढिगाऱ्यांमध्ये मुलं खेळतात, जनावरं प्लास्टिक खातात, डासांची पैदास होते.

महापालिकेच्या काळात काही झालं नाही. आता तरी स्वतंत्र नगरपालिका तोंड दाखवेल का? - रहिवासी, भिंगार

भिंगारला नुकतीच स्वतंत्र नगरपालिका मान्यता मिळाली. पण पूर्वीचे प्रश्न तसेच! फक्त नाव बदलणार, की परिस्थितीही? नागरिक थेट विचारतायत.

#### रस्ते म्हणजे कायम खोदकाम, वाहतूक कोंडी रोजचीच!

माळीवाडा परिसरात रस्त्याचं काम चालू आहे असं वाटतं कारण तिथे कायम खड्डे, खोदकाम, चिखल! काही भागांत रस्ता केला तरी लगेच फुटपाथसाठी पुन्हा खोदकाम! वाहनधारकांसाठी प्रवास म्हणजे सहनशीलतेची परीक्षा. भिंगार वेशीमार्गे




जाणारा मुख्य रस्ताही अतिक्रमणामुळे आजही अर्धवट!

रखडलेली कामं म्हणजे कंत्राटदारांचं पॉकेटमनीच वाटतं. - स्थानिक नागरिक

#### पाण्याचा दाब कमी, लाईट हरवलेला!

काही भागांत पाणी कमी दाबाने. लोकांनी घरटी टाक्या लावून पाणी साठवणं शिकलंय. विजेचे खांब झाडांच्या विळख्यात, काही ठिकाणी खांबच सापडत नाही. लाईट गेलं की एमएसईबी गप्प नागरिक मात्र काळोखात.

विजेचे खांब सरकारला दिसत नाहीत का? - रहिवासी

#### प्रश्न : आमदारांच्या वॉर्डातही हीच अवस्था?

ज्या वॉर्डात आमदार राहतात, तिथेच पाणी, लाईट, रस्ते नाहीत, कचऱ्याचे ढिगारे आहेत, तर बाकी नगरची काय अवस्था असेल याचा अंदाज लावावा लागतो. काही गल्ल्या झगमग, काही गल्ल्यांत दुर्गंधी, पाण्याचं साचं.



राष्ट्र सह्याद्री
प्रभागनामा
रोहिणी पवार
अहिल्यानगर

प्रभाग सुरू होतो मोठ्या कचराकुंड्यांनी - हेच स्वागत आहे का नगरकरांचं?
- व्यापारी, भिंगार

#### प्रशासन शांत, नागरिक त्रस्त!

भिंगार स्वतंत्र नगरपालिका होणार म्हणून की काय, रखडलेली कामं पुढे ढकलली. पण नागरिक विचारतायत - उद्याची नगरपालिका आली तरी आजचा ढिगारा हलणार का?

महानगरपालिकेच्या काळात भिंगारची घसरण सुरू झाली, आता नवा दम येईल का, लोक साशंक.

#### नावे बदलली, पण अवस्था तीच!

प्रभाग १४ ही फक्त एका आमदाराच्या वॉर्डाची नव्हे, तर नगर शहराच्या नियोजनाची असली लाजिरवाणी कहाणी आहे. काही गल्ल्या फोटोसाठी चकाचक, उरलेल्या ढिगाऱ्यांत.

आयुक्त साहेब, फाईलवर सही झाली असेल पण भिंगारच्या रस्त्यावर अजूनही नाकाला रुमाल लागतो!



### प्रशासनाला थेट सवाल

१. कचऱ्याचे ढिगारे हलत नाहीत स्वच्छतेच्या जाहिराती फक्त पोस्टरपुरत्या का?
२ पाणी कमी दाबाने यावर उपाय का नाही?
३ वीजखांब वेलीत हरवले कुणी पाहणार?
४ रस्त्याचं काम कायम रखडतं कारण काय?
५ भिंगारचा कचरा उचलणारा ठेकेदार आहे तरी कोण?
६ जुनी कामं रखडली नवीन नगरपालिका आल्यानंतर कुणी जबाबदारी घेणार?
७ काही गल्ल्या फोटोपुरत्या चकाचक, बाकी ढिगाऱ्यात भेदभाव संपणार कधी?

### नागरिकांच्या थेट प्रतिक्रिया

१ आमचं स्वागत कचराकुंडीनं होतं नाव बदला, अवस्था नाही!
**- व्यापारी, भिंगार**
'स्मार्ट सिटी'च्या पाट्या लावल्या पण गल्ल्या अजून ढिगाऱ्यांत.

२ पोकळे मळा, औसरकर मळा, रेणुकामाता मंदीर, भिंगार, पाणी कमी, टाकीशिवाय घर चालत नाही.
**- महिला, रेणुका माता मंदिर**
टाक्यांशिवाय घर चालत नाही; नळाला पाणी यायचं नाही हे आता सवयीचं.

३ प्रभागात भेदभाव - एका बाजूला रंगरंगोटी, दुसऱ्या बाजूला ढिगारे!
**- रहिवासी, भिंगार**
एका गल्लीत नव्या रंगाच्या भिंती, दुसऱ्या बाजूला उघडी गटारे.

४ लाईट गेली तरी खांब सापडत नाही, वेली झाकून टाकतात.
**- ज्येष्ठ नागरिक,**
पथदिवे वेलीत हरवलेत; लाईट गेला की वाट शोधावी लागते.

### प्रमुख मुद्दे -

**※ भिंगारमध्ये कचऱ्याचे ढिगारे, उघडी गटारे**
**※ रस्त्यांची कामं रखडलेली, वाहतूक कोंडी**
**※ पाणी कमी दाबाने, विजेची समस्या**
**※ काही भाग झगमग, काही भाग ढिगाऱ्यांत**
**※ नगरपालिका येणार, पण उत्तर आज हवं**